● पंढरपूर ● मंगळवार, १४ जानेवारी २०२५
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
● वर्ष २९ ● अंक - २३४




स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज' मध्ये यश PII



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा भारताला महासत्ता बनवू शकते ... PIII

# भक्तीचा महाकुंभ

## १४४ वर्षांनी अद्भुत संयोग! कोट्यवधी भाविकांचे पवित्र स्नान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली**- प्रयागराजमध्ये कालपासून ४५ दिवसांच्या महाकुंभमेळ्यास प्रारंभ झाला. काल सुमारे १ कोटी ५० लाखांहून अधिक भाविकांनी गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या पवित्र त्रिवेणी संगमात स्नान केले. २६ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महाकुंभमेळ्यात ४० कोटींहून भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. १४४ वर्षांनी दुर्मिळ संयोग जूळून आलेल्या महाकुंभ २०२५ ची सुरुवात आज प्रयागराजमध्ये पौष पौर्णिमेच्या पहिल्या स्नानाने झाली. या अमृतमय महाकुंभात देश आणि विदेशातील ४५ कोटींहून अधिक भाविक, साधू, संत 'श्रद्धेचे डुबकी' घेतील, असे उत्तर प्रदेश सरकारने म्हटले आहे. महाकुंभमेळ्यात ॲपलचे दिवंगत सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांच्या पत्नी लॉरेन पॉवेल सहभागी झाल्या आहेत. लॉरेन ह्या अध्यात्मिक गुरु स्वामी कैलाशानंद गिरी महाराज यांच्या आश्रमात दाखल झाल्या आहेत. स्वामी कैलाशानंद गिरी यांनी लॉरेन यांच्याबद्दल » पान ३ वर



### दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल

● महाकुंभ मेळ्याच्या आयोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार या सोहळ्याद्वारे उत्तर प्रदेश सरकारला २५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणार असून राज्याच्या अर्थव्यवस्थेत २ लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल. महाकुंभ २०२५ च्या माध्यमातून उत्तर प्रदेशच्या विकासासाठी, आर्थिक वाढीसाठी २ लाख कोटी रुपयांपर्यंतचं उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. या सोहळ्यासाठी ४० कोटी लोक येतील. या लोकांनी सरासरी ५,००० रुपये जरी खर्च केले तरी त्यातून दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल.



"पौष पौर्णिमेच्या निमित्ताने पवित्र स्नानाने प्रयागराजच्या पुण्यभूमीवर महाकुंभमेळ्याला सुरुवात झाली. आमची श्रद्धा आणि संस्कृतीशी जोडलेल्या या दिव्य प्रसंगी मी सर्व भाविकांचे मनापासून वंदन आणि अभिनंदन करत आहे. भारतीय आध्यात्मिक परंपरेचा हा विराट उत्सव आहे.
— नरेंद्र मोदी, पंतप्रधान



महाकुंभ हा श्रद्धा, विश्वास आणि वैदिक परंपरांचा अमृत कलश आहे. जिथे संस्कृतींचा संगमदेखील आहे. श्रद्धा आणि समरसतेचा संगमही आहे. 'विविधतेत एकता'चा संदेश देणारा महाकुंभ सनातनचा साक्षात्कार घडवून आणत आहे.
— योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री

आज पहाटे पहिले शाही स्नान झाले त्यापूर्वीच संगम येथे भाविक जमू लागले होते.

जगातील सर्वात मोठा मानवतेचा मेळावा आयोजित करण्यासाठी भारतात सहा आठवड्यांचा उत्सव सुरु झाला



प्रयागराज

**हर हर महादेव: उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आजपासून महाकुंभमेळा 2025 सुरू झाला आहे. या ऐतिहासिक कुंभमध्ये भारत आणि परदेशातील कोट्यवधी भाविक मोठ्या श्रद्धेने गंगा, यमुना आणि कल्पित सरस्वतीच्या संगमावर पोहोचले आहेत. यावेळी महाकुंभात 40 कोटींहून अधिक भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे.**

● ४,००० हेक्टर (९,९१० एकर) क्षेत्रावर पसरलेले तात्पुरते शहर नदीच्या काठावर वसले असून पर्यटकांच्या निवासासाठी १,५०,००० तंबू आहेत आणि येथे ३,००० स्वयंपाकघरे, १,४५,००० विश्रांतीगृहे आणि ९९ वाहनतळ आहेत.

## » At a Glance

### स्पर्धेत 5 प्रकारात बानपा कर्मचारी अव्वल




**बार्शी :** नगर विकास विभाग सोलापूर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम 2024 - 25 अंतर्गत बार्शी नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. या जिल्हास्तरीय स्पर्धेत 5 क्रीडा व सांस्कृतिक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत बार्शी तिथं सरशी असल्याचे बानपा कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले. सोलापूर जिल्हास्तरीय स्पर्धेतील विशेष प्राविण्यबद्दल विजेत्या कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्रक व मेडल देऊन जिल्हा सह आयुक्त, सोलापूर वीणा पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

### उमरड येथे भरदिवसा घरफोडी, ३ लाखांचा ऐवज लंपास




**करमाळा :** उमरड येथे भरदिवसा घराची कडीकोयंडा व कुलूप तोडून सोन्याच्या अंगठ्या व रोकड अशी ३ लाखांची चोरी झाली आहे. यामध्ये धर्मराज रामा चौधरी (वय ८१, रा. उमरड, ता. करमाळा) यांच्या फिर्यादीवरून अनोळखी चोरट्यांविरुद्ध करमाळा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत करमाळा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक पोपट टिळेकर करत आहेत.

### रोडरोमिओंना पोलिसांकडून मिळाला चोप



**माळशिरस :** नातेपुते येथील शाळा, महाविद्यालयांसह बसस्टॉपवर तरुणींची छेड काढणाऱ्या रोडरोमिओंना नातेपुते पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी चांगलाच चोप देऊन वाहनांवर कारवाई केली. नातेपुते येथील डॉ. बा. ज. दाते प्रशाला येथे पोलिसांनी धरपकड करून चोप देऊन कारवाई केली. सहायक पोलिस निरीक्षक महारुद्र परजणे रस्त्यावर थांबून करीत असलेल्या कारवाईमुळे रोडरोमिओंनी धूम ठोकली. रोडरोमिओंबाबत तक्रारी नातेपुते पोलिस ठाण्याकडे आल्या होत्या.

### बनावट दागिने देऊन 10 लाखांची फसवणूकं



**बार्शी :** माझी पत्नी आजारी असून माझ्याकडे जुने सोने आहे, असे सांगून दोघांनी मिळून दोन किलो बनावट सोने देऊन एकाची दहा लाख रुपयांची फसवणूक केली आहे. सव्वा बारा वाजता बार्शीतील शुभाष नगर भागात हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी बिट्टू (पूर्ण नाव माहीत नाही) व अन्य एक अनोळखी महिला अशा दोघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस तपास करीत आहेत. सध्या बार्शी शहरात चोरीचे सत्र सुरु झाले आहे. पहिल्या झालेल्या चोरीचा तपास अजून लागला नाही. नागरिकांत भितीचे वातावरण आहे.

# चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण; इलेक्ट्रिक बसची प्रतीक्षा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर येथील चंद्रभागा बस स्थानकामध्ये चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे. आता इलेक्ट्रिक बसची प्रतीक्षा चालक वाहक व प्रवाशांना असल्याचे दिसून येत आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज 50 हजाराहून अधिक भाविक येतात. यामुळे भाविकांना सुविधा मिळाव्यात म्हणून राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील सर्वात मोठे 28 प्लॅटफॉर्म असलेले व स्थानक पंढरपुरात उभा केले आहे. यामुळे प्रवासी व भाविकांची चांगली सोय झाली आहे. पंढरपुरात मोठ्या प्रमाणावर भाविक येत असल्याने एसटीची संख्या जास्त असणे गरजेचे आहे. पंढरपूर आगारात 90 एसटी बसेस असून यातील दहा बसेस नेहमी दुरुस्तीसाठी असतात. यातील 80 बसचा वापर होत आहे. शासनाने व परिवहन महामंडळाने 75 वर्षावरील प्रवाशांना मोफत एसटीचा प्रवास तर 65 वर्षावरील प्रवासी तसेच सर्व वयोगटातील महिलांना तिकीट दारात 50% सवलत दिली आहे. यामुळे एसटीचे प्रवासी वाढले आहेत. मात्र त्या प्रमाणात एसटी बसची संख्या पुरेशी नसल्याने प्रवाशांना बस स्थानकात ताटकळत उभे राहावे लागत आहे. एसटीस मोठ्या प्रमाणावर डिझेल लागत असल्याने यावर कोट्यावधी रुपयाचा खर्च होत आहे. तसेच एसटीतून निघणाऱ्या धुरामुळे प्रदूषण वाढत आहे. म्हणून राज्य परिवहन महामंडळाने इलेक्ट्रिक बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सर्वात अगोदर प्रत्येक बस स्थानकात चार्जिंग स्टेशन उभा करणे गरजेचे आहे. म्हणून पंढरपूर येथील चंद्रभागा स्थानकात दहा बसेस एकाच वेळी चार्जिंग होतील असे चार्जिंग स्टेशन उभा करण्यात आले आहे. मात्र अद्याप इलेक्ट्रिक बस आली नसल्याने चालक वाहक व प्रवासी यांना इलेक्ट्रिक वस्तू प्रतीक्षा असल्याचे दिसून येत आहे. तरी राज्य परिवहन महामंडळाने पंढरपूर आगारास जास्तीत जास्त इलेक्ट्रिक बसेस द्याव्यात अशी मागणी होत आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घालणे गरजेचे आहे.





### चार अमृत भारत एक्स्प्रेस सुरू?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रेल्वे प्रशासनाने विना वातानुकुलित आणि कमी तिकीट दर असलेली अमृत भारत एक्स्प्रेस सुरू केली आहे. कमी खर्चात आणि कमी वेळेत प्रवास करण्याची सुविधा असल्यामुळे या गाड्यांना प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. रेल्वे प्रशासन या गाड्यांचे जाळे वाढवण्याचा विचार करत आहे. या पार्श्वभूमीवर, पुणे रेल्वे स्थानकातून दोन आणि हडपसर रेल्वे स्थानकातून दोन अशा एकूण चार अमृत भारत एक्सप्रेस सुरू करण्याचा विचार रेल्वे प्रशासन करत आहे.

# नाना पटोलेंना डच्चू ? मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई**- विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये काही आलबेल नसल्याचे समजत आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बदलण्याच्या चर्चा मागच्या काही दिवसांपासून सुरु आहेत. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाला. 101 जागा लढवून काँग्रेसला केवळ 16 जागा जिंकता आल्या. या पराभवाची जबाबदारी स्वीकारत आपल्या पदाचा राजीनामा देण्याची तयारी सध्या प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दर्शवली आहे. यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये नवा प्रदेशाध्यक्ष मिळण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. वरिष्ठांकडून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाला पसंती दिल्याचे समजत आहे. काँग्रेस हायकमांडकडून बोलावणे आल्यामुळे पृथ्वीराज चव्हाण तातडीने दिल्लीला रवाना झाले आहेत. पुढच्या काही दिवसांत महाराष्ट्र काँग्रेसमध्ये नेतृत्व बदल झाल्याचे आपल्याला पाहायला मिळेल. नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाला पसंती दिल्याची माहिती आहे. पण पक्षातील तरुण चेहऱ्यांना नेतृत्वाची संधी द्यावी, अशी भूमिका चव्हाणांनी घेतली आहे. यासाठी पृथ्वीराज चव्हाणांनी माजी गृहराज्यमंत्री सतेज उर्फ बंटी पाटील आणि आमदार विश्वजीत कदम यांना प्रदेशाध्यक्ष पद द्यावं, असे काँग्रेस हायकमांडला सुचवले आहे.

# महाकुंभ मेळ्यानिमित्त चंद्रभागा नदीत भाविकांचे पवित्र स्नान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** बारा वर्षांनी एकदा कुंभमेळा येत असल्याने उत्तर प्रदेश येथील गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांच्या संगमावर पौष पौर्णिमा निमित्य लाखो भाविकांनी पवित्र स्नान केले आहे. पंढरपुरातील चंद्रभागा नदीला महत्त्व असल्यामुळे पंढरपुरात हजारो भाविक व नागरिकांनी पवित्र स्नान केले . गंगा, यमुना, सरस्वती या नद्यांना जेवढे महत्त्व आहे. तेवढेच महत्त्व पंढरपूर आतील चंद्रभागा नदीला आहे. आषाढी कार्तिकी यात्रेसाठी व वर्षाला येणारे एक कोटीहून अधिक भाविक चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करून नदीतील पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात. उत्तर प्रदेश येथे आज पौष पौर्णिमा पासून महाकुंभमेळ्यास सुरुवात झाली आहे. यानिमित्त गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांच्या संगम असलेल्या ठिकाणी लाखो भाविकांनी स्नान केले.येणाऱ्या भाविकांना उत्तर प्रदेश शासनाने सुविधा दिल्या आहेत. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात हजारो भाविकांनी व नागरिकांनी चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करून महाकुंभमेळ्याचा आनंद घेतला आहे. पंढरपुरात आज हजारो भाविक असल्यामुळे गर्दीने रस्ते फुलून गेले होते.



### माढ्यात ऊस दरासाठी शेतकऱ्यांकडून रास्ता रोको

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**करमाळा :** माढा-वैराग मार्गावर उदरंगाव येथे स्वाभिमानी शेतकरी संघटना, रासप, रयत क्रांती संघटना यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. माढा तालुक्यातील साखर कारखानदारांनी अद्याप ऊस दर जाहीर केलेला नाही. ते फक्त बघ्याच्या भूमिकेत आहेत. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत न पाहता घामाने पिकवलेल्या शेतकऱ्यांच्या उसाला पहिला हप्ता 3 हजार रुपये तात्काळ जाहीर करावा अन्यथा यापुढील दिवसात शेतकऱ्यांचा आक्रमकपणा काय असतो ते आम्ही दाखवुन देऊ अशा संतप्त प्रतिक्रिया यावेळी आदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या.

# नामसंकीर्तन सभागृहाचे काम रखडले; आ.अवताडे यांनी लक्ष घालण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील नाट्य कलावंतांना कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे व पंढरीत येणाऱ्या भाविकांना विविध धार्मिक कार्यक्रम करता यावेत म्हणून पंढरपुरात नामसंकीर्तन सभागृह उभारणीचे काम सुरू करण्यात आले. मात्र गेल्या पाच वर्षापासून या सभागृहाचे काम रखडले आहे. यामुळे नाट्यप्रेमी व भाविकातून नाराजी पसरली आहे. तरी आमदार समाधान आवताडे यांनी लक्ष देऊन नामसंकीर्तन सभागृह लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे.
पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. येणारे भाविक विविध मंदिर धर्मशाळा येथे धार्मिक कार्यक्रम करतात. यासाठी कांही वेळेस गैरसोय होते. तसेच पंढरपुरात अनेक नाट्य कलावंत आहेत व नाट्य रसिक आहेत. त्यांना नाट्यगृह नसल्यामुळे अडचण निर्माण होत आहे. राज्यात महायुतीची सत्ता असताना तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगुंट्टीवार पंढरपूर दौऱ्यावर आले असता माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मुनगुंट्टीवार यांना पंढरपुरात नाट्यगृह उभारण्यासाठी शासनाने निधी द्यावा अशी मागणी केली होती. यावेळी मंत्री मुनगुंट्टीवार यांनी पंढरपुरात वर्षाला कोट्यावधी भाविक येत असल्याने » पान ३ वर



## म्हैस दुधाच्या दरात चार रुपये घट

# दूध उत्पादक शेतकरी जिल्हा दूध संघाकडे पाठ फिरविणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यात वरचेवर दुधाला मागणी वाढत असल्यामुळे दरात वाढ होत आहे. यामुळे दूध मिळविण्यासाठी अनेक दूध डेरीचालक दुधाच्या दरात वाढ करत आहेत. मात्र सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाने म्हशीच्या दुधाच्या दरात चार रुपये कपात केली आहे. पन्नास रुपये लिटर दराने खरेदी होत असलेल्या दुधाला आता 46 रुपये दर मिळणार आहे. यामुळे शेतकरी जिल्हा दूध संघाकडे पाठ फिरविणार असल्याचे दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यात हरितक्रांती झाली असल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय सुरू केला. यामुळे शेतकऱ्यांचे दूध खरेदी करण्यासाठी सोलापुरातील राजकीय नेत्यांनी सोलापूर जिल्हा दूध संघाची स्थापना केली. या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात दूध संघाची शाखा सुरू करण्यात आली. यातून दिवसाला लाखो लिटर दुधाचे संकलन करण्यात आले. जिल्हा दूध संघ चांगल्या प्रकारे सुरू झाल्यामुळे या संघातून दुधापासून उपपदार्थ पेढे, आइस्क्रीम, पनीर अशा विविध वस्तू तयार करण्यास सुरुवात करण्यात आल्या. जिल्हा दूध संघाने अनेक ठिकाणी जागा खरेदी केल्या. मात्र सहकारात सहकार व नीट नियोजन नसल्याने गेल्या दहा वर्षापासून जिल्हा दूध संघाचे आर्थिक गणित बिघडले आहे. जिल्हा दूध संघ आर्थिक अडचणीत सापडू लागला आहे. दररोज लाखो लिटर दूध संकलन करणारा संघ सध्या दहा ते पंधरा हजार लिटर दूध संकलन करत आहे. राज्यात दुधाला चांगली मागणी आहे. यामुळे वरचेवर दुधाचे दर वाढत आहेत. दूध मिळविण्यासाठी डेअरी मध्ये स्पर्धा सुरू झाली असून अनेक जण दुधाला जास्त दर देऊ लागले आहेत. ज्या ठिकाणी जास्त दर मिळतात तेथे शेतकरी दूध देत आहे. अनेक डेअरी चालक सध्या म्हशीच्या दुधास पन्नास रुपयापेक्षा अधिक दर देत आहेत. त्याप्रमाणे सोलापूर जिल्हा » पान 3 वर



### तृतीयपंथीय परिषदेस मार्गदर्शनासाठी डॉ.वायकुळे निमंत्रण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** तृतीयपंथीयांच्या हक्क आणि सामाजिक कबदलांसाठी कार्यरत असलेल्या बार्शीचे सचिन वायकुळे यांना आंतरराष्ट्रीय तृतीयपंथीय परिषदेस मार्गदर्शनासाठी निमंत्रण मिळाले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथे ३० व ३१ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या या परिषदेत वायकुळे तृतीयपंथीय व सामाजिक बदल या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या परिषदेचे आयोजन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

# मतिमंद विद्यार्थ्यांनी लुटला निसर्गाचा आनंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पंढरपुरातील इनरव्हील क्लब पल्स संस्थे वतीने मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना चिंचणी गावातील ग्रामीण कृषी पर्यटनाची सहल घडविली. यामुळे विद्यार्थ्यातून आनंद व्यक्त करण्यात आला.
मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना निसर्गाचा आनंद लुटता यावा म्हणून इनरव्हील क्लब पल्स मधील सदस्यांनी विद्यार्थ्यांना पंढरपूर तालुक्यातील निसर्गरम्य असलेल्या चिंचणी गावात नेले. या ठिकाणी कृषी पर्यटन असल्यामुळे याचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळी खेळणी खेळली व चहा, नाश्ता, भोजन केले. त्यांना विविध प्रकारच्या झाडांची माहिती गावातील मोहन अनपट यांनी दिली. इनरव्हील क्लब नेहमीच सामाजिक कार्यक्रम राबवीत आहे. याचाच एक भाग म्हणून त्यांनी मतिमंद विद्यार्थ्यांना पर्यटन सहल घडविल्याबद्दल विद्यार्थ्यातून आनंद व्यक्त होत आहे.



**सांगोला :** दारूबंदीचा ठराव होऊनही, दारूबंदी होत नाही. त्यामुळे सांगोला तालुक्यातील अकोले गावात एक अनोखे पोस्टर सध्या चर्चेत आले आहे. दारूबंदी करण्यासाठी गावातील तरुणांनी एकत्रित येऊन " गावात दारू कुठेही मिळेल. " अशा आशयाचे पोस्टर लावले आहे. हेच पोस्टर अवैधरित्या होणारी दारू विक्री बंद करण्यासाठी परिणामकारक ठरेल असा विश्वास नव्या पिढीला वाटतो.

### २० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज'मध्ये यश

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** गोपाळपूर (ता. पंढरपूर) च्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'ई-सेल स्टुडन्ट टीम' चे विद्यार्थी 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज' मध्ये सहभागी झाले होते. आयआयटी बॉम्बेने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. यामध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या यशामुळे त्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार यांच्या सहकार्याने या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. हर्षवर्धन रोंगे यांचे मार्गदर्शन लाभले. स्वेरीच्या या विद्यार्थ्यांचे यश हे विशेष असे आहे कारण गोपाळपूर सारख्या ग्रामीण भागात असणाऱ्या स्वेरीतून शिक्षण घेऊन शहरी विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करत असूनही त्यांनी यश संपादन केले आहे. खेळ असो व स्पर्धा, स्वेरीचे विद्यार्थी हे परिश्रम करतातच हे 'नॅशनल आंत्रप्रनरशिप चॅलेंज' या स्पर्धेत मिळालेल्या यशावरून समजते. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये शिक्षण घेणाऱ्या समिक्षा खटावकर या विद्यार्थिनीच्या नेतृत्वाखाली सरस्वती शिंदे, माधवी स्वामी, सायली वाघमारे, सानिका बागल, समीक्षा गटकळ, शेलविका बोड्याल, संस्कृती बंडगर, प्रशांत गायकवाड, महेश घाडगे, आदित्य पाचोरे, प्रणव पवार, श्रीराम पतंगे, भूषण बागल, क्षितिजा उराडे, ऋतुजा बिचुकले, दिग्विजय बुर्रा, प्रज्वल मंठाळकर, चैतन्य सोनवणे व श्रीराम गजेंद्रगडकर या वीस विद्यार्थ्यांनी 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज'मध्ये सहभाग घेतला आहे. सांघिक कामगिरी करत असताना या विद्यार्थ्यांनी प्राथमिक फेरीमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली. त्यामुळे स्वेरीच्या या टीमने देश पातळीवर सतरावा क्रमांक पटकावला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांची दि.३१ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान 'आयआयटी बॉम्बे' मध्ये होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. तसेच हे विद्यार्थी 'आयआयटी बॉम्बे' च्या 'ई-समिट' मध्ये देखील सहभागी होण्यासाठी पात्र ठरले आहेत. आंत्रप्रन्युअरशिप मुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढीस लागतो. त्यामुळे चांगले करिअर करण्यासाठी हातभार लागतो. त्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकासात वाढ होते. स्वेरीमध्ये संशोधनात्मक कार्यशाळा होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना एक प्रकारची प्रेरणा मिळते. यासाठी ई-सेल टिम परिश्रम घेत आहे. या यशामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी.केने, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

## विवाहितेच्या छळप्रकरणी दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** वडिलांच्या मृत्यूनंतर मिळालेल्या नुकसान भरपाईतील दोन लाख दिले तरी आणखी पाच लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ करून हाकलून दिल्याप्रकरणी सासरच्या दहा जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मनीषा दिनेश भोसले ( वय 29, रा. अंबिकानगर, जोशी गल्ली, बाळे ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती दिनेश भोसले, विलास भोसले, सारिका सरवदे, सुभाष सरवदे, सुभाष सरवदे, सुनीता भोसले, उत्तम भोसले, भारत भोसले, भारत भोसले, दिलीप भोसले, सुनील भोसले, अरुण भोसले यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

Selected

## सहलीला गेलेले विद्यार्थी वैतागले

**सोलापूर :** चिंचोळी (ता. मोहोळ) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची सहल लेण्याद्री येथे गेली आहे. महामंडळाच्या एमएच १४, बीटी ४९८७ या बसगाडीतून त्यांची सहल रवाना झाली. पण, लेण्याद्रीला पोचण्यापूर्वीच वाटेत त्यांची बस बंद पडली. विद्यार्थ्यांना दोन तासांनी दुसऱ्या बसची व्यवस्था करुन लेण्याद्रीला रवाना करण्यात आले. अजूनही सहलीतील काही ठिकाणांना भेटी द्यायचे बाकी असतानाच पुन्हा एकदा त्या बसमध्ये बिघाड झाल्याचे शिक्षकांनी बोलताना सांगितले. त्यामुळे सहलीला जाण्यासाठी ज्या-ज्या ठिकाणी जायचे होते त्या ठिकाणी जाता आले नाही. त्यामुळे सहलीला गेलेले विद्यार्थी वैतागले असल्याचे दिसून आले.

## खासदार प्रणिती शिंदे मतदारसंघाच्या दौऱ्यावर



**सोलापूर :** खासदार प्रणिती शिंदे यांनी आपल्या सोलापूर लोकसभा मतदासंघातील मोहोळ तालुक्यातील नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन सोडविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन गावभेट दौरा आयोजित केला आहे. त्याअंतर्गत पिरटाकळी, विरवडे बु. या गावांना भेट देऊन ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या आणि निवेदने स्वीकारली. यावेळी सुलेमान तांबोळी, राजेश पवार, बाळासाहेब डुबे पाटील, सुभाष पाटील, सुनील पवार, मुकुंद अवताडे, दिनकर पवार, उमेश अवताडे, हरिभाऊ अवताडे, वाघमारे, प्रीतम पाटील, प्रमोद अवताडे, बापू गव्हाणे उपस्थित होते.

## आमदार देशमुख यांचा कुसुर येथे जनसंवाद दौरा



**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुभाष देशमुख हे जनसंवाद दौऱ्यावर असून त्यांनी तालुक्यातील कुसुर येथे भेट दिली. यावेळी ते म्हणाले ग्रामस्थांच्या प्रत्येक समस्येच्या निराकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असून आगामी काळात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करून गावाला समृद्ध करण्यासाठी मी प्रयत्नशील असेन, अशी ग्वाही दिली. यावेळी संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, यतीन शहा, सुनील नांगरे, अनिल नांगरे, सोहम अळीगिडा, गौरीशंकर मेंडगुदले व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अपघातात युवकाचा जागीच मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** सोलापूर शहरातील एका युवकाचा अपघातात जागीच मृत्यू झाला आहे. सोलापूर - मंगळवेढा रोडवर हिंगोली गावाजवळील पेट्रोलपंपाजवळ एका कारने पाठीमागून जोरात धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकलवरील तरुण जागीच ठार झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला. हा अपघात रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडला. तुषार अनिल पवार ( वय 22, रा. राजेश कोठे नगर, सोलापूर ) असे ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातानंतर तुषार पवार याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## बहुजन शिक्षक महासंघातर्फे महिलांचा सन्मान



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाच्यावतीने महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या सोलापूर महानगरपालिका हिरवळीवर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित संघटनेतील महिलांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पबुके देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रारंभी डॉ. श्रुतिका उडानशिव यांची वैद्यकीय सेवेत डॉक्टरपदी रुजू झाल्यानिमित्त तसेच स्वप्नजा कसबे, फरीदा बेलीफ, महानंदा शिंदे आदी महिलांचा सत्कार करण्यात आला.

## सन्मान

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अकलूज :** महाबलिपूरम येथे अभ्यास दौऱ्यावर असताना आंध्रप्रदेश भाजपच्या अध्यक्षा श्रीमती खा.डी. पुरंदेश्वरी यांनी खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सन्मान केला. यावेळी वॉटर रिसोर्स कमिटीचे अध्यक्ष खा.राजीव प्रताप रूडी उपस्थित होते.

## प्रभाग 1 येथे विकासकामांचे उदघाटन



**सोलापूर :** सोलापूरचे माजी पालकमंत्री तथा शहर उत्तरचे आमदार विजय देशमुख यांच्या निधीतुन प्रभाग क्रमांक 1, सम्राट चौक, माने वस्ती येथे नवीन ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे या विकास कामांचे उद्घाटन आमदार विजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक अमर पुदाले, संजय कणके, पिंटू ढावरे, शांतीकुमार नागटिळक, लक्ष्मण लोंढे, रामा डिगोळे, सिध्दांत नागटिळक, किसन कांबळे, बापू नागटिळक, सुमित राजगुरु, सोनु कोणे, निलेश शिंदे, रोनक लिंबोळे, संकेत राजगुरु, समर्थ व्हटकर आदी उपस्थित होते.

## बाळासाहेब कर्णवर पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**माळशिरस :** सद्गुरु कारखान्याचे अभ्यासू व्हाईस चेअरमन डॉ. बाळासाहेब कर्णवर पाटील यांचा वाढदिवस पत्रकार बहुउद्देशीय संघाच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी कर्णवर-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : सद्गुरु कारखान्याचे अभ्यासू व्हाईस चेअरमन डॉ. बाळासाहेब कर्णवर पाटील यांचा वाढदिवस पत्रकार .बहुउद्देशीय संघाच्या वतीने जल्लोषमय वातावरणात संपन्न झाला. यावेळेस विद्यार्थ्यांना खाऊ वाटप ,वह्या वाटप ,वृक्षारोपण तसेच वेळापूर येथे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला या सत्कार समारंभासाठी. . प्रमुखपाहुणे रजनीश बनसोडे.. सरपंच वेळापूर ग्रामपंचायत .बलभीम जाधव साहित्यिक, विजय कचरे उद्योजक उपस्थित होते .यावेळीस पत्रकार बहुउद्देशीय संघाचे विजय चव्हाण, उद्धव जाधव ,सचिन ओवाळ, संजय निंबाळकर, संतोष पवार व बाळासाहेब कर्णवर पाटील मित्र परिवार उपस्थितित होता.

## माजी उपमहापौरावर खंडणीचा गुन्हा दाखल




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सिद्धार्थ हौसिंग सोसायटीमधील महिलेला नवीन सभासद करण्यासाठी दोन लाख, तर दुसऱ्या एका महिलेला एनओसी देण्यासाठी एक लाख रुपयाची मागणी करून दमदाटी केल्याप्रकरणी सोलापूरचे माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड ( रा. सिद्धार्थ हौसिंग सोसायटी) यांच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी सुशील तीपण्णा पोतेनवरू (वय 65, रा. सिद्धार्थ सोसायटी ) व मीनाक्षी संजय जगताप ( वय 59, रा. सिद्धार्थ सोसायटी ) यांनी फिर्याद दिली आहे.

## नीरा उजवा कॅनॉलमध्ये आढळून आला अनोळखी इसमाचा मृतदेह

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : भांबुर्डे तालुका माळशिरस च्या शिवारात निरा उजवा कॅनॉल च्या पाण्यात शुक्रवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कॅनॉल च्या पाण्यात मृतदेह आढळून आला आहे.



सदर मयत इसमाचे कोणी नातेवाईक असल्यास माळशिरस पोलीस ठाण्याचे संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले आहे.
भांबुर्डे गावाच्या शिवारात निरा उजवा कॅनॉलच्या पाण्यात 50 ते 55 वर्ष वयाचे पुरुष जातीचे प्रेत आढळून आले आहे.
सदर मयताचा रंग सावळा ,उंची 160 सेंटीमीटर, मजबूत बांधा, गोल चेहरा, टक्कल पडलेले केस ,पांढऱ्या रंगाचा फुल भाईचा शर्ट व त्यावर लालसर रंगाच्या उभ्या रेषा, निळसर रंगाचे जीन्सची पॅन्ट असे मयताचे वर्णन आहे. तरी संबंधित नातेवाईकाने माळशिरस पोलीस स्टेशन ची संपर्क साधण्याचे आव्हान पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल एस.टी. घोगरे करीत आहेत.




### पंढरपूर अधिवक्ता संघाच्यावतीने

# राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले जयंती साजरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** 13 जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती पंढरपूर अधिवक्ता संघामार्फत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. टी. बी. साळुंखे होते.
अभिवादन करताना पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष राजेश चौगुले यांनी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांनी आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज दिले. त्यामुळे आपल्याला स्वराज्य मिळाले. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षणाच्या अधिकार दिला. त्यामुळे आपल्याला समाजामध्ये महिला आपल्या बरोबरीने सर्व क्षेत्रांमध्ये दैदिप्यमान यश प्राप्त करताना दिसतात.



पुढे बोलताना पंढरपूर अधिवक्ता संघाचे सचिव अॅड. अभयसिंह देशमुख यांनी जिजाऊ माँसाहेब व सावित्रीबाई फुले यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये संघर्ष करून एक समाज घडविण्याचा व समाज परिवर्तन करण्याचा महान असे कार्य केले. या कार्याचा त्यांनी गौरव केला. पुढे पंढरपूर अधिवक्ता संघातील उपाध्यक्ष अॅड. महेश कसबे यांनी तत्कालीन काळातील उदाहरणे देऊन अतिशय खडतर परिस्थितीमध्ये स्वराज्याचा व समाज परिवर्तन याचा ध्यास बाळगून या दोन महात्म्यांनी जे कार्य केले त्या कार्याला त्यांनी नमन केले. तसेच अॅड.अखिलेश वेळापुरे, अॅड. विलास शेळके, अॅड. भारत बहिरट यांनी पंढरपूर अधिवक्ता संघातील पदाधिकाऱ्यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाची प्रशंसा केली. माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल गौरद्वार केले. तसेच पंढरपूर आधिवक्ता संघातील जेष्ठविधीज्ञ वसंतराव भादुले यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार पंढरपूर अधिवक्ता संघामार्फत करण्यात आला. त्यांनीही आपल्या मनोगतात माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीस अभिवादन केले. पंढरपुर अधिवक्ता संघातील पदाधिकाऱ्यांच्या उपक्रमास प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अॅड. रेखा शाहू यादव यांनी केले. तसेच सदर कार्यक्रमांमध्ये अॅड. विजयकुमार नागटिळक, अॅड. निकिता अवताडे, अॅड. अमोल देसाई, अॅड. गणेश चव्हाण, अॅड. ,शिर्के, अॅड. झांबरे, अॅड. घोगरदरे, अॅड. विवेक चौंडावार, अॅड. अल्ताफ शानुरकर आदी सर्व सीनियर ज्युनिअर विधीज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरी संचार

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने पदवीप्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले. या समारंभात डॉ. महादेव अशोक ढगे यांना महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. समारंभात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर आणि आय. सी. टी. मुंबईचे कुलपती प्रा. जे. बी. जोशी उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालयाचे उद्घाटन

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा भारताला महासत्ता बनवू शकते : परिचारक

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**भंडीशेगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा भारत देशाला महासत्तेपर्यंत पोहोचवू शकते. संघ संपवन्याची भाषा करणारे संपले परंतु संघ कधीच संपला नाही,असे विचार विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंढरपूर येथील प्रसिद्ध त्वचारोग तज्ञ डॉक्टर अरुण मेनकुदळे उपस्थित होते.

कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिका भंडीशेगाव यांच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालयाच्या उद्घाटन व स्वामी विवेकानंद पुरस्कार 2025 चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंढरपूर येथील डॉ. मनोज भायगुडे यांनी जम्मू-काश्मीर येथे मोफत आरोग्य शिबिरास उपस्थित राहून सेवा बजावल्याबद्दल त्यांना यावर्षीचा स्वामी विवेकानंद पुरस्कार माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले.




**माळशिरस :** डॉ.मनोज भायगुडे यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी डॉ. श्रीधर येलमार, डॉ. अरुण मेनकुदळे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद यांनी भारताच्या पारतंत्र्यात देखील हिंदुत्वाची ज्योत तेवत ठेवण्याचे महान कार्य केले. स्वामी विवेकानंद यांनी जगभरातील सर्व धर्माची शिकवण अभ्यासून भारतीय तत्त्वज्ञानावर अभ्यास केला. तरुणांनी सातत्याने अभ्यास करून कष्ट करून आपले ध्येयप्राप्ती करावी असे विचार मांडणारे आणि देशाबद्दल प्रचंड प्रेम असणारे स्वामी विवेकानंद यांचे जीवन चरित्र यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. सचिन लादे यांनी सर्वांसमोर व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भंडीशेगाव ग्रामपंचायत च्या नूतन सरपंच सुमन यलमार-पाटील व नूतन उपसरपंच प्रियांका ननवरे यांचा सत्कार माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आला. स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालयासाठी लागणारी सर्व प्रकारची पुस्तके देण्याचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी आश्वासन दिले, त्याचप्रमाणे वाचनालयास लागणारी दोन कपाटे डॉ. मनोज भायगुडे यांनी देण्याची मान्य केले. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतचे सरपंच सुमन यलमार यांनी ग्रामपंचायतीचे मिळालेले संपूर्ण मानधन स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षेस देण्याची मान्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीधर येलमार यांनी केले, प्रास्ताविक डॉ. हेडगेवार वाचनालयाचे अध्यक्ष महेंद्र येलपले यांनी केले तर आभार डॉ. अनिल कंडरे यांनी मानले. कार्यक्रमास पंढरपूर येथील उद्योजक बाळासाहेब लोकरे, बांधकाम व्यावसायिक कुमार वाघमोडे, हरेकृष्ण आश्रमातील गोशाळेचे गोपालक राधा गिरीधर नगरसेवक सचिन शिंदे, संजय येलपले, कैलास खुळे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमार, गंगाराम विभुते, शिवाजी कोळवले, भाजपाचे दत्ता शिंदे, माजी सरपंच राजाभाऊ माने, संतोष ननवरे, डॉ. धरतीराज शिंदे, जी. बी. गायकवाड, ज्ञानेश्वर यलमार-पाटील, सतीश रणखांबे, कर सल्लागार राजेंद्र केसकर, गणेश पाटील, वाखरी येथील चंद्रकांत मस्के, डॉ. हेडगेवार वाचनालयाचे महेंद्र येलपले, चंद्रशेखर कोळवले, सहेली दांडिया ग्रुपच्या सर्व महिला सभासद आदी उपस्थित होते.

## गोवंश मांस विक्रीप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** करमाळा- अहिल्यानगर रस्त्यावर जातेगाव येथील एका हॉटेलमध्ये बेकायदा गोवंश सदृश प्राण्याचे मांस विक्रीप्रकरणी तिघांविरुद्ध करमाळा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. शाकीर कुरेशी, रहमत मल्लू खान व दीपक काकडे अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. यामध्ये पोलिस तोफीक काझी यांनी फिर्याद दिली आहे. जातेगाव येथील एका हॉटेलमध्ये बेकायदा गोमांस विक्री होत असल्याची माहिती करमाळा पोलिसांना मिळाली होती. याप्रकरणी तिघांना संशयित आरोपी म्हणून पोलिसांनी अटक केली असून याबाबतचा अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

» पान १ वरुन

## भक्तीचा महाकुंभ

बोलताना सांगितले की, 'त्या खूप धार्मिक आणि आध्यात्मिक आहेत. त्या माझ्या एका वडिलाप्रमाणे आणि एक गुरु म्हणून आदर करतात. जग भारतीय परंपरांचा स्वीकार करत आहे. शाही स्नानासाठी प्रशासनाने १०.५ किमी लांबीचा घाट तयार केला असून आखाड्यातील प्रवेशासाठी दोन विशेष रस्ते तयार करण्यात आले आहेत. नागा साधूंसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. आपत्कालीन स्थितीसाठी विशेष मार्ग तयार करण्यात आला आहे. भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती, परंपरा आणि विशाल मानवी समुदायाचा सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाकुंभमेळ्यास प्रारंभ झाला. पुढील दीड महिन्यांत तब्बल ४० कोटी भाविक या मेळ्याला येतील, अशी शक्यता गृहीत धरूनच उत्तर प्रदेश सरकारने या सोहळ्याची तयारी केली आहे. श्रद्धा, व्यापार व आधुनिक व्यवस्थापन यांचा मिलाफ असलेल्या या महाकुंभामागे एक प्रचंड आर्थिक यंत्रणा कार्यरत आहे. ही यंत्रणा स्थानिक व राष्ट्रीय स्तरावर आर्थिक प्रगतीस चालना देत आहे. योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने महाकुंभसाठी ६,९९० कोटी रुपये खर्च करून ५४९ प्रकल्प सुरू केले आहेत. याअंतर्गत विकासापासून स्वच्छतेपर्यंतची अनेक कामं चालू आहेत. २०१९ मधील कुंभमेळ्याशी तुलना केल्यास त्यावेळी ३,७०० कोटी रुपये खर्च करून ७०० प्रकल्प हाती घेण्यात आले होते.

## नामसंकीर्तन सभागृहाचे काम रखडले

भाविकांना विविध धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी तसेच पंढरपुरातील नाट्य कलावंत व रसिकांना नाटकाचा आनंद मिळावा म्हणून नामसंकिर्तन सभागृह उभारणार असल्याचे जाहीर केले. यासाठी नगरपरिषदेने जागा द्यावी. तात्काळ निधी मंजूर करण्यात येईल असे सांगितले. त्याप्रमाणे पंढरपूर नगरपरिषदेने नामसंकीर्तन सभागृहासाठी जागा दिली. याचे काम सुरू करण्यात आले आहे. चांगल्या प्रकारे नामसंकिर्तन सभागृह उभारण्यात आले आहे. याचे काम 90% पूर्ण झाले आहे. अद्याप दहा टक्के काम निधी अभावी रखडले आहे. तरी याकडे आमदार समाधान आवताडे यांनी लक्ष घालून नामसंकीर्तन सभागृहाचे काम पूर्ण करून घ्यावे अशी मागणी भाविक व नाट्य प्रेमीतून होत आहे.

पंढरपुरात नाट्यगृह नसल्यामुळे नाट्य प्रेमींना सोलापूरला जाऊन नाटके पहावी लागत आहेत. तसेच कलावंतांना कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळत नसल्यामुळे अडचण निर्माण होत आहे. जानेवारी महिन्यात पंढरपुरातील अनेक शाळांमधून स्नेहसंमेलन करण्यात येते. या स्नेहसंमेलनासाठी शाळांना योग्य जागा नसल्यामुळे अनेक शाळांना गैरसोय सहन करावी लागते. नामसंकीर्तन सभागृह सुरू झाले असते तर याचा उपयोग शाळांना स्नेहसंमेलन घेण्यासाठी झाला असता. तरी लवकरात लवकर नामसंकीर्तन सभागृहाचे काम पूर्ण करण्यात यावे अशी मागणी होत आहे.

## दूध उत्पादक शेतकरी जिल्हा दूध ....

दूध संघ म्हशीच्या दुधाला पन्नास रुपये दर देत होता. मात्र 13 जानेवारी पासून जिल्हा दूध संघाने दुधाच्या दरात चार रुपयाने कपात केली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे दूध आता 46 रुपये दराने खरेदी करण्यात येणार आहे. वरचेवर पशुखाद्याच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. डेअरी चालक दूध 50 ते 60 रुपये दराने खरेदी करून बाजारात 70 ते 80 रुपये लिटर दराने विक्री करत आहेत. यामुळे दुधाच्या दरात वाढ करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे. मात्र जिल्हा दूध संघाने म्हशीच्या दुधाच्या दरात कपात केली असल्यामुळे शेतकऱ्यात नाराजी उमटली आहे. यामुळे अनेक शेतकरी जिल्हा दूध संघाकडे पाठ फिरविणार असल्याचे दिसून येत आहे.

## उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी विकास कामांवर चर्चा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार दिलीप माने यांनी मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री पदावर निवड झाल्याबद्दल पवार यांना शुभेच्छा दिल्या. तसेच दक्षिण सोलापूर मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी गंगाधर बिराजदार, अप्पासाहेब काळे आणि प्रथमेश पाटील उपस्थित होते.

## उद्घाटन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** आधार महिला नागरी पतसंस्थेचं उद्घाटन माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. पी.बी.रोंगे यांच्यासमवेत पतसंस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी व अनेक मान्यवर उपस्थित होते.

## » Selected

## रेल्वे विभागाच्या प्रकल्पांवर सकारात्मक चर्चा

**सोलापूर :** सोलापूर रेल्वे विभागाचे नवनियुक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) डॉ. सुजीत मिश्रा यांचे सोलापूर विकास मंचच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सोलापूरच्या विकासासाठी रेल्वे विभागाच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित करत, सोलापूर रेल्वे विभागाच्या सध्याच्या प्रकल्पांवर आणि आगामी योजना राबवण्यासाठी सकारात्मक चर्चा झाली. यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा, मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, उदयशंकर चाकोते, राजेंद्र बिराजदार, अजित शहा आदी सदस्य उपस्थित होते.

## जातेगावच्या हॉटेलात मांस विक्रीप्रकरणी गुन्हा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** करमाळा-अहिल्यानगर मार्गावर जातेगाव येथील एका बेकायदा गोवंश सदृश प्राण्याचे मांस विक्रीप्रकरणी तिघांविरुद्ध करमाळा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत तोफीक काझी यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी शाकीर कुरेशी, रहमत मल्लू खान व दीपक काकडे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. जातेगाव येथील एका हॉटेलमध्ये बेकायदा गोमांस विक्री होत असल्याची माहिती करमाळा पोलिसांना मिळाली होती. याबाबत आरोपीस अटक करण्यात आली आहे.

## वडापूरकरांच्या अपेक्षांवर खरे उतरणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर जनतेचे आभार मानण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर येथे नागरिकांची भेट घेतली. या भेटीत ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. या यशामागे जनतेचा विश्वास आणि पाठिंबा महत्त्वाचा असल्याचे नमूद करून, भविष्यातही जनतेच्या अपेक्षांवर खरे उतरण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. यावेळी संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, यतीन शहा, सुनील नांगरे, गौरीशंकर मेंडगुदले, सुनील सुतार, अरविंद पाटील, प्रभाकर गरड उपस्थित होते.

## मद्यपी बसचालकावर सांगोला पोलिसांत गुन्हा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** एसटी बसच्या चालकाने मद्य प्राशन करून बस चालवून प्रवाशांच्या जिवाशी खेळ करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना सांगोल्याहून जतकडे निघालेल्या बसमध्ये घडली. याप्रकरणी सहायक वाहतूक अधीक्षक पंकज श्रीराम तोंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बसचालक सुभाष अप्पासाहेब साळुंखे (रा. लोहगाव, ता. जत, जि. सांगली) याच्याविरुद्ध सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लक्ष्मी उद्यानाचा भ्रष्टाचारामुळे होणारा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी शहरातील भवानी पेठ भागात स्थित लक्ष्मी उद्यानाची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली आहे. नगर पालिकेच्या निधीतून दरवर्षी लाखो रुपये खर्च करूनही या उद्यानात स्वच्छता, देखभाल आणि सुधारणा यांचा पूर्णतः अभाव दिसून येतो. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. बार्शी नगरपालिकेकडून लक्ष्मी उद्यानाच्या देखभालीसाठी दर महिन्याला मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला जातो.

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिजाऊ जयंती उत्साहात साजरी



**सोलापूर :** संभाजी ब्रिगेडच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ चौकामध्ये जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जिजाऊंची प्रेरणा घेऊन आजच्या महिला, मुलींनी सक्षम व निर्भय होणे गरजेचे आहे. जिजाऊ मा साहेबांच्या विचारांचा आदर्श घेऊन विविध क्षेत्रात मुलींनी आपला ठसा उमटवावा, तसेच संकटावर मात करण्याची प्रेरणा जिजाऊ मा साहेबांपासून घेतल्यास कोणत्याही संकटावर मात करायची ताकद निर्माण होऊ शकते, असे विचार आनंद काशीद यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.




## सौभाग्य लेणे असलेल्या चुड्यास महागाई टंचाईचा फटका

# दर घटले, मागणी कमी; कारखानदार सापडला अडचणीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सन 1980-81 या सालापासून चुडा तयार करण्यात आली. मकर संक्रातीच्या पार्श्वभूमीवर पंढरीत महिला मंदिरात जाऊन वाणवसा करतात. सौभाग्याचे लेणे म्हणून चुडा हातात घालतात यामुळे चुड्यास चांगली मागणी असते. लाख मोलाचा लाखेचा चुडा, मोत्याची नथनी, भरभरीत पैठणी, लाखेचा चुडा, कुंकवाचा करंडा, चांदीची पैजण, सोन्याचं डोरलं, केसाचा अंबाडा, मोगऱ्याचा गजरा.

भारतीय संस्कृतीमध्ये महिलांच्या यात साज श्रृंगार आला. वेगळे महत्त्व आहे. मकर संक्रातीला अखंड सौभाग्याचा वसा घेण्यासाठी लाखेचा चुडा घालण्याची परंपरा भारतीय परंपरा आहे. शिवाय महाराष्ट्र तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी लाखेचा चुडा घालणे शुभ मानले जाते. पंढरपुरामध्ये लाखेपासून चुडा तयार करण्याचा लखेरी समाजाचा परंपरागत व्यवसाय आहे. मात्र काळानुरुप लाखेच्या चुड्यांचा



व्यवसाय समाजापुरता मर्यादित राहिला नसून आता इतर समाजातील मंडळी ही व्यवसाय करू लागले. मात्र यंदा जानेवारी 2025 वर्षी महागाई टंचाईचा चुडास फटका बसला आहे. चुडे घेण्यासाठी परगावचे व्यापारी पंढरीकडे फिरकले नाहीत. यामुळे चुड्याचे दरही गडगडले आहेत. गेल्या 40 वर्षापासून संक्रातीमध्ये चांगली मागणी असलेल्या चुड्यावर यंदा महागाई ची संक्रात आली असल्याचे दिसून येत आहे. तसेच चुडा कारखानदार राजू जवेरी यांनी सांगितले, मालाला उठाव नसल्याने चुड्याचे दर कमी केला आहे. तरीही व्यापारी खरेदीसाठी आलेले नाहीत. यामुळे व्यापारी वर्गात चिंता व्यक्त होत आहे. तीर्थक्षेत्र पंढरपुरातील संत पेठ भागात अनेक चुडा करण्याचे कारखाने आहेत. चुडा करणारी 50 ते 60 कुटुंब असून तेथे घरगुती पद्धतीने हे चुडे तयार केले जातात. गेल्या 25 ते 30 वर्षापासून मी हा व्यवसाय करीत असल्याचे कारखानदार राजू जवेरी यांनी सांगितले आहे. स्त्रियांना तर इतका सराव झालेला आहे की दहा ते बारा स्त्रिया पाच ते सहा हजार जुडे दिवसातून तयार करतात. हा व्यवसाय वर्षभर चालतो. चुडा तयार करण्यासाठी लाख पिवळी एकत्र करून ती एका शेगडीवर ठेवून त्यापासून लगदा तयार केला जातो. यानंतर लाखेचे छोटे छोटे गोळे तयार करून लाल साधी बांगडी तयार करून त्यावर पन्नी लावून त्यास चुड्याचा आकार दिला जातो. नंतर छाप उमटला जातो. हे संपूर्ण काम हातावर मजुरीच्या सहाय्याने केले जाते. यासाठी महिला व पुरुष काम करतात. यातून महिलांना,पुरुषांना रोजगार निर्माण उपलब्ध होत आहे अशी माहिती पंढरपूर तालुका वृत्तपत्र लेखक नितीन गुणवंत सातपुते यांनी दिली आहे. चुड्यामध्ये गजरा, गोकरू, तोडा, छंद, नामदेव, पाटले असे प्रकार आहेत. लाखांचा दर हजारी ३५०० ते ४ हजार रुपये आहे. आकर्षक चुड्याची मागणी असल्याने भिंग लावून अनेक रंगातील चुडा तयार करण्यात आलेला आहे. या भिंगांची नावे देवयानी खडा, भिंग, काच खडा, काशी खडा, रंगोली, हळदीकुंकू अशी भिंग आहेत. याचा दर ५ ते ६ हजार रुपये इतका आहे असे कारखानदार संत पेठ भागातील रामेश्वर सातपुते यांनी सांगितले. पंढरपूरचा चुडा प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी संक्रातीपूर्वी सोलापूर जिल्ह्यासह मुंबई आणि आंध्र, उस्मानाबाद, पुणे, सांगली, कोल्हापूर, लातूर, औसा, उदगीर, जालना, आंबेजोगाई जिल्ह्यातील बांगडी व्यापारी चुडा खरेदी करुन घेऊन जातात. पंढरी नगरीत मंदिरालगत प्रदक्षिणाम मार्ग चंद्रभागा नदीपात्रात महिला चुडा विकतात. चुडा व्यवसायाच्या महागाईमुळे यंदा चुडे खरेदीसाठी परगावचे लोक आलेच नाहीत. व्यापाऱ्यांनी पाठ फिरविल्याने वर्षभर कारखानदार यांनी केलेले चुडे पडून आहेत. त्यामुळे कारखानदार व लहान-मोठे कारागिर यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

संपादकीय विशेष

# नक्षलवादाला लगाम

गेली अनेक वर्षे तळ ठोकून बसलेल्या नक्षलवादाचा प्रभाव महाराष्ट्रामध्ये मुख्यत्वे विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा या भागांमध्ये आपण पाहिला आहे. आताही छत्तीसगडमध्ये माओवाद्यांनी घडवलेल्या घातपातामध्ये आठ जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यामुळेच नक्षलवादाने प्रभावित असणारा हा भाग 'रेड कॉरिडॉर' का मानला जातो, याचे उत्तर मिळाले. मात्र यामुळे पावले मागे घेऊन चालणार नाही. विशेषत: 2000 च्या दशकात या भागात नक्षलवाद मोठ्या प्रमाणावर सक्रिय होता. स्वाभाविकच स्थानिक प्रशासनावर तसेच नागरिकांवर गंभीर परिणाम झाला होता. मात्र अलिकडच्या काही महत्त्वपूर्ण घटना, मान्यवर नेत्यांचे या भागातील वाढते दौरे, कट्टर नक्षलींनी आत्मसमर्पण करण्याच्या घटना आणि नजिकच्या काळात संबंधित भाग नक्षलमुक्त करण्याचा सोडलेला संकल्प यामुळे आश्वासक चित्र तयार झाल्याचे दिसत आहे.

नक्षलवादामुळे निर्माण झालेले धोके विकासाला प्रतिबंध करण्याचे, तो रोखण्याचे काम करतात. यातून होणारा हसाचार गंभीर नुकसानीचे कारण ठरतो. जसे की, आत्तापर्यंत नक्षलवादी गटांकडून पोलीस, वन अधिकारी आणि स्थानिक नेत्यांवर हल्ले होण्याच्या घटनांमध्ये अनेकांनी जीव गमावले होते. खेरीज सामान्य नागरिकांवर संशय घेऊन हसाचार केला जात होता. नक्षलवाद्यांच्या भीतीमुळे सरकारच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामांना अपेक्षित वेग येत नव्हता. काम करणे कठीण झाले होते. परिणामस्वरुप रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधा या प्रभावित भागातील लोकांपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. एकीकडे अशा प्रकारे वंचित राहणाऱ्या आदिवासी आणि स्थानिक लोकांना नक्षलवादी गटांकडून होणाऱ्या जबरदस्तीमुळे सहकार्य करणे भाग पाडत असे. त्यामुळे सरकारकडूनही त्यांच्यावर संशय घेतला जाई. थोडक्यात, बराच काळ या लोकांना दुहेरी संकटांचा सामना करावा लागला. दुसरीकडे, या प्रश्नामुळे जंगलातील खनिज संपत्ती आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा योग्य विकास होऊ शकला नाही. सहाजिकच व्यापार-उद्योगांवरही विपरीत परिणाम झालेला दिसला. मात्र आता परिस्थितीमध्ये सुधारणा होत आहे. सरकारने गडचिरोली आणि आसपासच्या भागात विशेष पोलीस दल तैनात केले आणि विविध विकास योजना राबवल्या. स्थानिकांना शिक्षण, रोजगार आणि मूलभूत सुविधा पुरवण्याचा प्रयत्न केला.



आज उत्तर गडचिरोली जिल्हा नक्षलवादमुक्त झाला असला तरी दक्षिण गडचिरोली जिल्हा नक्षलवादमुक्त करण्याचे आव्हान अद्याप कायम आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी गडचिरोलीचे पालकमंत्री म्हणून कार्यरत राहण्याच्या घेतलेल्या निर्णयाकडे बघावे लागेल. महायुती सरकार आपल्या दुसऱ्या कार्यकाळात या क्षेत्राच्या विकासावर भर देणार असल्याचे संकेत मिळत आहेत. विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून 1982 मध्ये निर्माण करण्यात आलेल्या गडचिरोली जिल्ह्याने राज्याच्या 4.68 टक्के क्षेत्राचा समावेश केला आहे. गेल्या सात दशकांपासून येथे नक्षलवादी कारवाया जोरात सुरु आहेत. खाणी आणि खनिजे यासारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या या प्रदेशाला भारताचे पुढील स्टील हब बनवण्याचा फडणवीस यांचा निर्धार आश्वासक आहे. या संपूर्ण भूभागामध्ये विपुल संसाधनांसह अफाट क्षमता आहे. देशातील 30 टक्के लोखंड आणि पोलाद या भागामध्ये आहे, असे म्हटले जाते. यामुळेच येथे उद्योगाला चालना मिळाली तर सर्वांगीण विकास होऊन रोजगाराची दारे खुली होतील. यापूर्वी पोलीस अधिकाऱ्यांना शिक्षा म्हणून गडचिरोलीकडे पाठवले जायचे. सत्तेत असणाऱ्या सरकारांनीही जिल्ह्याची जबाबदारी त्या त्या भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांवर सोपवण्याचे धोरण अवलंबले. मात्र आर. आर. पाटील यांच्या कार्यकाळापासून ही प्रथा बदलली. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांचाच कित्ता गिरवत असून महायुती सरकार या बेरोजगारीग्रस्त आदिवासी क्षेत्राच्या विकासासाठी मोठे गुंतवणूक प्रकल्प राबवण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील नक्षलवाद आतापर्यंतच्या नीचांकावर असणे ही येथिल सर्वाधिक आश्वासक बाब आहे. प्रमुख नक्षलवादी एक तर घातपातात सापडले आहेत किंवा त्यांनी आत्मसमर्पण केले आहे. फडणवीस यांच्या म्हणण्यानुसार या क्षेत्रात यापूर्वीच 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. फडणवीस यांनी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गडचिरोली जिल्ह्याला भेट दिली. त्यांच्या उपस्थितीमध्ये 11 जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांमध्ये आठ महिला आणि तीन पुरुष असून यामध्ये दोन दांपत्य आहेत.

नक्षलींचा बिमोड करण्यासाठी आत्तापर्यंत सरकारने अनेक कार्यक्रम हाती घेतले. अनेक मोहिमा राबवल्या. कमी-अधिक प्रमाणात त्यांना यशही आल्याचे दिसले. उदारहणार्थ, सरलेल्या वर्षात 24 नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले. गेल्या सहा महिन्यांमध्ये 16 आणि एक जानेवारी रोजी 11 असे एकूण 27 जहाल नक्षलवादी मुख्य प्रवाहात आले आहेत. गेल्या चार वर्षांमध्ये एकही युवक किंवा युवती माओवादात सहभागी झाले नाहीत, ही मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. भारतीय संविधानच न्याय मिळवून देऊ शकते, माओवादी विचारसरणीकडे वळून न्याय मिळू शकत नाही, हे जनतेला आता पटले आहे. निश्चितच हे चित्र आशादायी आहे.

नजिकच्या भविष्यात गडचिरोलीला 'पोलाद सिटी'चा दर्जा मिळेल, हे मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य या भागाच्या विकासाला दिले जाणारे प्राधान्य दाखवून देणारे आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या अतिदुर्गम भागात पोहोचणारे फडणवीस हे पहिले मुख्यमंत्री आहेत. स्वातंत्र्यानंतर 77 वर्षांमध्ये प्रथमच अहेरी ते गर्देवाडा अशी एसटी सेवा सुरू झाली असून या एसटीला हिरवा झेंडा दाखवून फडणवीस यांनी त्यातून प्रवासही केला. त्यांच्या हस्ते कोनसरी येथे लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा प्रारंभही करण्यात आला. दुसरीकडे, गडचिरोली जिल्ह्यातील दीड हजार युवक पोलीस दलात सामील झाले असून नोंद घेण्याजोगी बाब म्हणजे त्यात 150 नक्षली कुटुंबांमधील युवकांचा समावेश आहे. पोलिसांसाठी निवासस्थाने, जीम, बालोद्यान इत्यादींचेही लोकार्पण करण्यात आले. एकंदरित शिक्षण, रोजगार, गुंतवणूक, विकास आणि पुनर्वसन या पंचसूत्रीचा अवलंब करण्यात येत असल्यामुळे नक्षलग्रस्त भागामध्ये आशादायी चित्र तयार झाले आहे.

# विजयाचे रहस्य उलगडणारा शिर्डीचा सांगावा

गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला चांगले यश मिळत गेले. गोवा, मध्य प्रदेश, राजस्थान, ओडिशा, आसाम, छत्तीसगड या राज्यांची सत्ता मिळाली. लोकसभेत भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार तिसऱ्यांदा सत्तेत आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जागतिक प्रतिमा आणखी उंचावली. दुसरीकडे, हरियाणात भाजपने तिसऱ्यांदा सत्ता मिळवून राज्याच्या इतिहासात नवा विक्रम केला. जम्मू-काश्मीरमध्ये उच्चांकी जागा मिळवल्या. महाराष्ट्रात लोकसभेला अपयश आले असले, तरी विधानसभेत हे अपयश धुवून काढून आतापर्यंतच्या इतिहासात कधी नव्हे एवढ्या जागा मिळवल्या. अर्थात त्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्यूहनीतीचे मोठे यश आहे. त्याचे कौतुक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. विधानसभा निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे सर्वांच लक्ष लागलेले आहे. गेल्या बऱ्याच वर्षांमध्ये या निवडणुका झालेल्या नाहीत. आता ओबीसींच्या आरक्षणावरील सर्वोच्च न्यायालयातील पेच सुटेल आणि तीन-चार महिन्यांमध्ये या निवडणुका होतील, असे सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिर्डीच्या अधिवेशनातच केले. याचा अर्थ एप्रिल-मे मध्ये महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिकांच्या निवडणुका होऊ शकतात. या निवडणुकीसाठी भाजपच्या पदाधिकाऱ्यांना फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी चैतन्याचा डोस दिला. शहरी भागात भाजपचे वर्चस्व असते. तुलनेत ग्रामीण भागात प्रभाव कमी आहे, हे लक्षात घेऊन आता 'खेड्याकडे चला' असा कानमंत्र मंत्र्यांना आणि संघटनात्मक नेत्यांनाही या अधिवेशनातून दिला गेला.

विधानसभा निवडणुकीत भरघोस यश मिळवल्यानंतर भाजपकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. फडणवीस, शहा, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विधानसभेपेक्षाही मोठा विजय प्राप्त करायचा निर्धार भाजपने केला आहे. अधिवेशन शिर्डीमध्ये असल्याने साईबाबांच्या 'श्रद्धा आणि सबुरी'चा उल्लेख महत्वाचा होता. फडणवीस यांनी तो करताना विरोधकांना चांगलाच टोला लगावला. 'श्रद्धा आणि सबुरी'चा मंत्र भाजपसाठी महत्त्वाचा आहे. श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ न समजलेल्यांची हालत बुरी झाली, अशा

**भारतीय जनता पक्षाने शिर्डीत राज्यस्तरीय अधिवेशन घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले. श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ न समजलेल्यांची हालत बुरी झाली, अशा शब्दांमध्ये फडणवीस यांनी विरोधकांना यावेळी टोला लगावला. नरेंद्र मोदी यांना माधव आणि मतदारांना केशव अशी उपमा देत त्यांच्यामुळे आणि संघाच्या सुक्ष्म नियोजनामुळे आपल्याला निवडणूकयुद्धात विजय मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

शब्दांमध्ये त्यांनी विरोधकांना टोला लगावला. फडणवीस यांनी महाभारतातील गोष्ट सांगत नरेंद्र मोदी यांना माधव आणि मतदारांना केशव अशी उपमा दिली. या 'केशव' आणि 'माधव' यांच्यामुळे आपल्याला निवडणुकीच्या युद्धात विजय मिळाला, असे फडणवीस म्हणाले. मला कुठल्याही धार्मिक ग्रंथापेक्षा भारताचे संविधान महत्त्वाचे आहे. कारण हेच संविधान सामान्यांची सेवा करण्यासाठी शक्ती देते, असे मोदी म्हणतात. विरोधकांनी भाजपवर संविधान धोक्यात आणत असल्याचा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी ठेवून लोकसभा निवडणुकीत फायदा उठवला. भाजपने याच मुद्द्यावरच विरोधकांची कोंडी करण्याची नीती अवलंबली. भाजपच्या शिर्डीच्या अधिवेशनात संविधानाची प्रत व्यासपीठावर ठेवली होती. संविधानाचे यंदाचे अमृतमहोत्सवी वर्ष भारताची लोकशाही मजबूत करण्यासाठी, संविधान रुजवण्यासाठी वापरायचे आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

मागोवा

अजय तिवारी

शिर्डीच्या अधिवेशनातून आणखी एक महत्त्वाचा संदेश भाजपने दिला आहे. आता शिवाजी महाराजांच्या घोषणांचा वापर करत मराठी मतदारांना आपलेसे करण्याबरोबरच सर्व हिंदू मतांचे ध्रुवीकरण करण्यावर भाजपचा भर आहे, हे या अधिवेशनातून दिसले. शिवसेनेचा ठाकरे गट आक्रमक हिंदुत्त्वाकडे वळल्याचे दिसताच भाजप आणखी आक्रमक झाला. 'व्होट जिहाद,' बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी आणि डाव्यांच्या अतिरेकीवादावर आक्रमक होताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक है तो सेफ है!' या घोषवाक्याला आगामी निवडणुकीत प्राधान्य देण्याचा कानमंत्र भाजपच्या या अधिवेशनातून दिला गेला आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात संविधानविरोधी शक्ती, अराजकतावादी शक्तींचा प्रादुर्भाव महाराष्ट्रात पहायला मिळाला. भाजप आणि मोदी यांना पराभूत करता येत नाही, असे काँग्रेस, उध्दव ठाकरे, शरद पवार यांच्या पक्षाला वाटले, तेव्हा त्यांनी अराजकवादी शक्तींना एकत्र घेऊन देशात अराजकता पसरवण्याचा प्रयत्न केला, असा फडणवीस यांचा आरोप होता. देशात अलिकडच्या काळात बांगलादेशी घुसखोर सापडत आहेत. ते कागदपत्रे बनवून घेऊन मतदार याद्यांमध्ये शिरत असल्याचा दावा त्यांनी केला. मालेगावमधून शेकडो नवीन जन्म प्रमाणपत्रे लोकांना मिळाली. मालेगाव, अमरावतीतील अंजनगाव आदी ठिकाणी अचानक शंभर लोकांना जन्म प्रमाणपत्र मिळत आहे. 50-60 वर्षांचे लोक जन्म प्रमाणपत्र काढत आहेत. हा 'व्होट जिहाद'चा पार्ट 2 सुरू झाला आहे, असा धक्कादायक दावा फडणवीस यांनी केला.

शिर्डीच्या अधिवेशनातील भाजपच्या वक्त्यांची भाषणे पाहिल्यास काँग्रेसला कमी आणि शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना अधिक लक्ष्य केले गेल्याचे दिसले. पवार यांच्या 1978 पासूनच्या विश्वासघातकी राजकारणाचा संदर्भ देत भाजपने या दगाबाजीच्या राजकारणाला मूठमाती दिली, असे शहा यांनी सांगितले. त्याचबरोबर अधिवेशन भाजपचे असले, तरी राज्यात सहकारी असलेल्या शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे कौतुक करण्याचा मोठेपणा दाखवण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छाप या अधिवेशनावर असणे स्वाभावीक होते. शहा यांनी त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले, अडीचशे पेक्षा कमी सदस्य असतील असा एकही बूथ नसावा. येणाऱ्या दीड महिन्यात इतक्या जोमाने काम करा की प्रत्येक बूथवर 250 पेक्षा जास्त सदस्य जोडले जातील. सर्व महानगरपालिका, नगरपालिका स्थानिक संस्थांच्या निवडणुका समोर आहेत, त्यात विरोधकांना बसायलासुद्धा जागा मिळणार नाही, याची काळजी तुम्ही सर्वांनी घ्या, असे आवाहन त्यांनी केले. पंचायतीपासून संसदेपर्यंत विजयाचे सूत्रधार बनण्याचा कार्यक्रम शहा यांनी दिला. आगामी काळात महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि राज्यातील सुमारे 70 हजार ग्रामपंचायतीच्या निवडणुका आहेत. त्याची तयारी या अधिवेशनातून करण्यात आली.

लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला दोन कोटी मते मिळाली होती. विधानसभेमध्ये तीन कोटी 11 लाख मते मिळाली. भाजपला 52 टक्के मते मिळाली. आता सरकार आणि संघटन एकत्र ठेवून काम करायचे आहे, असा निर्धार करण्यात आला. भाजपच्या मंत्र्यांना महिन्यातून एकदा खेड्यात मुक्काम करावा, अशा सूचना देण्यात आल्या. मंत्र्यांकडून अपेक्षित असणाऱ्या कामांचा निपटारा होण्यास यामुळे मदत मिळेल. तसेच यामुळे गावांमधील पदाधिकाऱ्यांची, जिल्हाध्यक्षांची भेट होईल असे सांगण्यात आले. ग्रामीण जनतेच्या समस्या समजून घ्यायच्या असतील, तर पक्षाच्या मंत्र्यांना खेड्यात जावेच लागेल. त्यांच्याशीच संवाद साधावा लागेल. भाजपच्या प्रत्येक मंत्र्यांच्या कार्यालयात एक ओएसडी असा असेल, जो फक्त पक्ष संघटनेशी संबंधित कामांकडे लक्ष देईल, अशी रचना करण्यात येणार आहे. महाअधिवेशनाच्या पूर्वसंध्येला भाजपच्या कार्यकारी प्रदेश अध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची निवड आली.

दरम्यान, संघाच्या सूचनेनुसार भूपेंद्र यादव यांच्याकडे महाराष्ट्राच्या निवडणुकीची जबाबदारी सोपवण्यात आली होती. संघाने पश्चिम प्रांताचे प्रमुख राहिलेले अतुल लिमये यांना भाजप नेते बी. एल. संतोष आणि भाजप तसेच आरएसएस यांच्यातील समन्वयक अरुणकुमार यांच्या साथीने काम करण्यास सांगितले होते. महायुतीमध्ये अजित पवार यांच्या समावेशाबाबत संघात काहीशी नाराजी होती, तरीही त्यांनी सगळे काही विसरून या निवडणुकीत लोकांपर्यंत मुद्दे पोहोचवण्यासाठी मदत केली गेली. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपच्या कामगिरीने निराश झालेल्या संघाच्या नेतृत्वाने या वेळी आधीच 'गृहपाठ' केला होता. संघाने सूक्ष्म नियोजन करून काम केले. लोकसभा निवडणुकीतील सरासरी कामगिरीनंतर संघाने राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात एक समिती तयार केली. त्या समितीने लोकांना भेटून, राज्याच्या महायुती सरकारच्या बाबतीत आणखी काय सुधारणा करता येतील, याचा अंदाज घेतला. या कामासाठी देशातील अनेक राज्यांमधून संघ कार्यकर्त्यांना पाचारण करण्यात आले होते. भाजपचे सरकार नसलेल्या तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि हिमाचल प्रदेश सारख्या राज्यांमधूनही स्वयंसेवकांना बोलावण्यात आले होते. या सर्वांनी लहान शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये दौरे केले. काँग्रेस आणि इतर पक्षांचे सरकार असलेल्या इतर राज्यांमध्ये सरकारे निवडणुकीतील आश्वासन कशा प्रकारे विसरतात, हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी महाराष्ट्र सरकार महिला सबलीकरणासाठी कशा प्रकारे प्रयत्न करत आहे, हे ही पटवून दिले गेले. त्याचा योग्य परिणाम झाला. आता हीच नीती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये वापरण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय भूगोल दिन



आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहीत आहे. भूगोल हा विषय आपण शालेय जीवनापासून शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलाचे ज्ञान अफलातून होते त्यामुळे त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी डॉ सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिवस म्हणून साजरा केला जातो.

भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील Geography या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरुन आलेल्या या शब्दाचा अर्थ 'भूवर्णन शास्त्र' पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते. भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे. १) प्राकृतिक भूगोल २) मानवी भूगोल ३) प्रादेशिक भूगोल प्राकृतिक भूगोलात भूरूप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबतच किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही प्राकृतिकभूगोलात समावेश होतो.


श्याम ठाणेदार

मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो

प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्तोत्रांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो.

भूगोलाच्या सखोल सविस्तर अभ्यासात विविध पद्धतींचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, नकाशे यांना तर भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, ड्रोन कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरिक्षण क्षमतेत भर घातली आहे.

मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग त्याचे स्वरूप, विविध भूप्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.




## राशीभविष्य

- **मेष** : समाधानकारक घटना घडतील. नोकरीत अधिकार वाढतील. शारीरिक तक्रारींकडे लक्ष द्या.
- **वृषभ** : प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. कौटुंबिक जीवनात सामंजस्यानं रहावं. व्यवसायात प्रगती होईल.
- **मिथुन** : उत्साह, धडाडी वाढेल. सरकारी कामांसाठी अधिक पाठपुरावा करावा. दिवस चांगला राहील.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. महत्त्वाची कामं होतील. निर्णय विचारानं घ्यावेत.
- **सिंह** : फार दगदग करू नका. स्थावर प्रश्न सामोपचारानं हाताळावेत. कला–गुणांचा विकास होत जाईल.
- **कन्या** : सर्व बाबतीत जागरूक रहावं. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. कामाचा व्याप कमी होऊ लागेल.
- **तूळ** : अडचणीतून मार्ग काढावा लागेल. खर्च वाढणार आहेत. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवू शकतात.
- **वृश्चिक** : उत्साह, धडाडी वाढेल. कोणत्याही बाबतीत आग्रही राहू नका. आर्थिक व्यवहार विचारानं करावेत.
- **धनु** : कलेचा गौरव होईल. सभा, संमेलने गाजवाल. खर्च वाढले तरी प्राप्ती चांगली होत जाणार आहे.
- **मकर** : परिश्रमाचं योग्य फल मिळत जाईल. आशादायी वातावरण निर्माण होईल. अपेक्षित घटना घडतील.
- **कुंभ** : अपेक्षित कामं मनासारखी होतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सुसंधींचा लाभ उठवायला हवा.
- **मीन** : खर्च सत्कारणी लागेल. परिश्रमाचं योग्य चीज होईल. नव्या कामांना गती मिळेल. चिंता करू नका

सल्ला मोलाचा

## फॉर स्पेशल लूक

लग्नसराई सुरू आहे. आपण चारचौघींपेक्षा वेगळं दिसावं असं तुम्हालाही वाटत असेल. पण यासाठी केवळ उंची प्रावरणं घालून उपयोग नाही, तुमचं सर्वांग प्रफुल्लित आणि टवटवीत असायला हवं. असं असेल तर सगळ्यांच्या नजरा तुमच्याकडे वळायलाच हव्या. * शरीराचा सर्वात जास्त थकणारा अवयव म्हणजे पाय. म्हणूनच आपल्या पायांची नीट काळजी घ्यायला हवी. पायातला ओलावा टिकवला तरंच ते मुलायम राहतील. यासाठी दररोज रात्री कोमट पाण्यात १० ते १५ मिनिटे पाय बुडवून ठेवा. टाचेवरची मृत त्वचा स्क्रबरनं काढून टाका. पाय धुवून स्वच्छ पुसून घ्या. एखादं फूट क्रीम लावा आणि पायात मोजे घालून झोपा. * संपूर्ण शरीर ताजतवानं व्हावं यासाठी पार्लर, स्पामध्ये विविध प्रकारच्या ट्रिटमेंट्स असतात. बजेटनुसार तुम्ही एखादी ट्रीटमेंट घेऊशकता. उन्हामुळे स्कीन टॅन झाली असेल तर ब्लीच करून घेऊ शकता. सौना बाथने शरीरातली विषद्रव्ये काढून टाकू शकता. * केसांना मसाज करून तुम्ही त्यांचं सौंदर्य वाढवू शकता. रात्रभर तेल लावून दुसऱ्या दिवशी हेअर स्पा करून घ्या किंवा घरच्या घरीच चांगल्या शँपूने केस धुवा.

## १४ जानेवारी

दिनविशेष

- १८९८ : रेव्हरंड चार्ल्स डॉडजसन या गणितीतज्ज्ञाचा मृत्यू.
- १९०५: मराठी, हिंदी चित्रसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री दुर्गा खोटे यांचा जन्म.
- १९४१ : दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडमध्ये व्यापाऱ्यांनी सुरू केलेला काळा बाजार रोखण्यासाठी खास कायदे.
- २००२ : चीन आणि भारत यांच्यात नवी दिल्ली येथे विज्ञान तंत्रज्ञानविषयक देवाण–घेवाणीचा करार.

महत्त्वपूर्ण काही...

## असा पडतो प्रकाश

आजकाल ट्युबलाईट वा सीएफएल बल्बचा वापर बराच वाढला आहे. परंतु पूर्वी पिवळट प्रकाश देणारे काचेचे बल्ब वापरले जात. त्यांचा प्रकाश आतील तार तापल्यामुळं बाहेर पडणाऱ्या ऊर्जेच्या रुपात मिळतो. तार तापावी, प्रकाशमान होण्याइतकी तापावी; पण त्या उच्च तापमानाला तुटु नये यासाठी टंगस्टन धातुचा वापर केला जात असे. या धातूची तार कितीही तापली तरी ती तुटत नाही. तिच्यामधुन विजेचा प्रवाह वाहू लागला की, तापमान वेगानं चढत जातं आणि प्रकाश बाहेर पडू लागतो. ट्युबलाईटचा प्रकाश वेगळ्या प्रक्रियेतुन मिळतो. त्या काचेच्या नळीच्या दोन टोकाला दोन विद्युताग्रे–इलेक्ट्रोड्स असतात. त्या दोन टोकांमधुन विजेचे स्फुल्लिंग उडतात. त्या नळीच्या आतल्या पृष्ठभागावर स्फुरदिप्तीमान म्हणजे फ्लोरोसेंटचा गिलावा दिलेला असतो. शिवाय त्या पाऱ्याची वाफही असते. दोन टोकांना असलेल्या विद्युताग्रांना चेतवून त्यांच्यामधून स्फुल्लिंग बाहेर पडतील अशी व्यवस्था केली जाते. त्याच्या ठिणग्या पाऱ्याच्या वाफेतून वाहू लागल्या की जंबुपार किंवा अतिनील किरणे बाहेर पडू लागतात. ती फ्लोरोसेंट पदार्थावर पडली की त्यातून दृश्य प्रकाश निर्माण होतो.

## पंचांग

**मंगळवार, १४ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. १, नक्षत्र : पुनर्वसु
चंद्रराशी : कर्क, विष्कंभ योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२०

## फॉरवर्डस

अव्यक्त प्रेमातील मजाच काही वेगळी असते. कवी म्हणतो,

**मोहब्बत उनसे आज भी**
**बहुत करते हैं,**
**मना वे नही करतें बयां**
**हम नहीं करते...**

आरोग्यमंत्र

## कफविकारात दिलासा

थंडीच्या दिवसात सर्दी, खोकला या बरोबरच कफ निर्माण होण्याची समस्याही उद्‌भवते. या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास ती अधिक त्रासदायक ठरण्याची शक्यता असते. त्यामुळे या समस्येवर वेळीच तज्ज्ञ डॉक्टरकडून उपचार करून घ्यावेत. अर्थात, काही घरगुती उपायांनीही कफाची समस्या दूर करता येऊ शकते. अशा काही उपायांविषयी जाणून घेऊ...



* आवश्यक त्या प्रमाणात हळदपूड साजूक तुपावर मंद आचेवर भाजून एक चमचा आले आणि तुळशी रसात तीन वेळा घ्यावी.
* वारंवार कफ ,सर्दी, पडसे, खोकला पडत असल्यास सुवर्ण सुतशेखरची मात्रा दोन डाळी एवढा मध,मोरावळा, किंवा दूध साखरेतून सकाळ–संध्याकाळ घ्यावी.
* दररोज दोन वेळा ओवा आणि गुळ, हळद यांचं मिश्रण जेवणानंतर चावून खाल्ल्यास कफाची समस्या दूर होण्यास मदत होते.
* शक्यतो रोज गरम पाणी प्यावं. फ्रिजचं पाणी पिणं टाळावं.
* आल्याचा रस, मध आणि हळद सम प्रमाणात घेऊन त्यांचं चाटण दिवसातून दोन वेळा घेतल्यास कफाच्या विकारात आराम मिळतो.
* हळद, मिरपूड, चिमुटभर मध, कोरफडीचा गर यांचं चाटण घेतल्यास कफाचे बेटके येणं बंद होतं.
* रोज रात्री गरम पाण्यात त्रिफळा चूर्ण टाकून घेतल्यास कफाच्या विकारातून कायमस्वरूपी सुटका होते.

## वाचा तर खरं

* चेहऱ्याला मध चोळल्यास कोरडी त्वचा कोमल होते आणि त्वचेला उजळपणा येतो.
* एक चमचा तांदळाचे पीठ, चिमूटभर हळद घ्या. त्याच एक चमचा दही घालून पेस्ट तयार करा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि पंधरा मिनिटे सुकू द्या. चेहरा धुतल्यानंतर ग्लो आलेला दिसेल.
* दोन चमचे जवाचे पीठ घ्या. त्यात अर्धा चमचा ग्लिसरीन आणि थोडेसे ऑलिव्ह ऑईल घालून पेस्ट तयार करा. या पेस्टचा लेप पंधरा मिनिटे तेलकट चेहऱ्याला लावून ठेवा. चेहरा धुतल्यावर चमक जाणवेल.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

» Selected

## थापलिंग यात्रेत धावले २३३ नवसाचे बैलगाडे



श्री क्षेत्र थापलिंग (नागापूर, ता. आंबेगाव) येथील खंडोबा देवाचे यात्रेत नवसाच्या बैलगाड्यांमधील एक चित्तथरारक क्षण.

**रांजणी :** पौष पौर्णिमेनिमित्त नागापूर (ता.आंबेगाव) येथिल थापलिंग खंडोबा देवाच्या यात्रेच्या पहिल्या दिवशी २३३ नवसाचे बैलगाडे टोकन पद्धतीने धावले.अशी माहिती थापलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष देवदत्त निकम यांनी दिली. उत्तर पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा म्हणून थापलिंगची यात्रा ओळखली जाते. दरवर्षी पौष पौर्णिमेला दोन दिवस ही यात्रा मोठ्या प्रमाणावर भरते. या यात्रेचे खास वैशिष्ट्य म्हणजे घाटात धावणारे नवसाचे बैलगाडे. थापलिंग यात्रेत बैलगाडा मालक केवळ श्रद्धेपोटी नवसाचे बैलगाडे पळवितात.ही परंपरा फार पूर्वी पासूनची आहे. यासाठी सहभागी बैलगाडा मालकांना कोणतेही बक्षिस अथवा इनाम दिला जात नाही. परंतु श्रद्धेपोटी मोठ्या प्रमाणावर बैलगाडे पळवले जातात. हे बैलगाडे पाहण्यासाठी पंचक्रोशीतील बैलगाडा शौकिनांची मोठी गर्दी होत असते. गेले दोन-तीन वर्षांपासून यात्रा ट्रस्टच्या वतीने बैलगाडे हे टोकन पद्धतीने पळविले जातात. यापूर्वकाळात बैलगाडा मालक हे रांगेने बैलगाडे सोडत होते . परंतु यासाठी संपूर्ण दिवस, रात्र तेथेच रांगेत थांबावे लागत होते. परंतु आता ट्रस्टने टोकन पद्धतीने बैलगाडा गाडे सोडायला सुरुवात केली असल्याने त्यांचा आता त्रास कमी झाला आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी ही मंगळवारी (दि . १४ ) देखील नवसाचे बैलगाडे पळवले जाणार आहेत. धावत्या बैलगाड्यांचे समालोचन नागापूर गावचे सरपंच गणेश यादव, बाळासाहेब टेमगिरे, बाळासाहेब मेंगडे, संभाजी निचित, लक्ष्मण बांगर, सौरभ पवार, सुभाष लांडगे आदी करत आहेत.

## जेजुरी पत्रकार संघाच्या वतीने पोलिसांचा सन्मान



**जेजुरी :** कायदा आणि सुरक्षा राखण्याचे काम पोलीस तर समाजाच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम पत्रकार करीत असतात. सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम दोघे करतात.पोलिसांच्या चांगल्या कामाची दखल पत्रकारांनी घेतली आहे, असे जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी सांगितले. महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाचे औचित्य साधून जेजुरी शहर पत्रकार संघाच्या वतीने पोलिसांच्या सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दीपक वाकचौरे बोलत होते. या कार्यक्रमात पत्रकार संघाच्या वतीने पोलीस आधिकारी व पोलीस कर्मचारी वर्गाचा प्रशस्तीपत्रक देवून सन्मान करण्यात आला. मोहन महाराज खोमणे, गणेश जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सोमवती यात्रेच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल पोलिसांचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमा वेळी दीपक वाकचौरे, पोलीस उपनिरीक्षक नामदेव तारडे, पुणे जिल्हा पत्रकार हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष बी एम काळे, पुरंदर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कामथे, जेजुरी शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष नितीन राऊत, विजयकुमार हरिश्चंद्रे यांची भाषणे झाली. पुरंदर तालुका पत्रकार संघाचे सचिव अमोल बनकर, मंगेश गायकवाड, पदाधिकारी प्रकाश फाळके, राहुल शिंदे, भरत निगडे, किशोर कुदळे, समीर भुजबळ, महावीर भुजबळ, छाया नानगुडे, जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, दिपाली पवार, तसेच जेजुरी, वाल्हे, नीरा येथील पत्रकार बांधव उपस्थित होते. प्रास्ताविक बी एम काळे यांनी तर सूत्रसंचालन जेजुरी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष नीलेश जगताप यांनी केले, तर आभार प्रकाश फाळके यांनी मानले.

## जातेगाव बुद्रुकच्या जल जीवन मिशनला सुरुवात

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक येथील ग्रामस्थांना पिण्याच्या शुध्द पाण्यासाठी मंजूर झालेल्या जल जीवन मिशन योजने अंतर्गत हर घर जल या योजनेला अखेर सुरुवात करणात आल्याने ग्रामस्थांना लवकरच शुध्द पाणी मिळणार आहे. जातेगाव बुद्रुकमध्ये पिण्याच्या शुध्द पाण्यासाठी जल जीवन मिशन योजना मंजूर झालेली असून, या योजनेच्या कामाचे नुकतेच पंचायत समितीचे माजी सभापती सुभाष उमाप, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त दत्तात्रय वारे गुरुजी, सरपंच निलेश उमाप यांच्या हस्ते गावातील सर्व जेष्ठ व्यक्ती व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या योजनेतील कामांचे भूमिपूजन झाले, सदर योजनेतून स्मशानभूमी शेजारी जुन्या बैलगाडा घाटात जल जीवन मिशन योजनेच्या पाणी साठ्यासाठी पाणी साठवण तलाव बांधण्यात येत असून येथे चासकमान कालव्याचे पाणी साठवण करुन गावामध्ये जल शुद्धीकरण प्रकल्प उभारुन नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी देण्यात येणार असल्याने नागरिक देखील समाधान व्यक्त करत आहे.

# थापलिंग यात्रेला उत्साहात सुरुवात

## पहिल्या दिवशी घेतले एक लाख भाविकांनी श्रीखंडोबाचे दर्शन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



रांजणी — पौष पौर्णिमेनिमित्त नागापूर (ता. आंबेगाव ) येथील श्री क्षेत्र थापलिंग यात्रेला उत्साहात प्रारंभ झाला. तळीभंडार करण्यासाठी मंदिराभोवती भाविकांनी केलेली गर्दी. (छाया : रोहीत खुडे)

**रांजणी :** पौष पौर्णिमेनिमित्त पुणे जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नागापूर (ता. आंबेगाव ) येथील श्री क्षेत्र थापलिंग खंडोबा देवाच्या यात्रेला उत्साहात प्रारंभ झाला. यात्रेच्या पहिल्या दिवशी एक लाखाहून अधिक भाविकांनी खंडोबाचे दर्शन घेतले. "सदानंदाचा येळकोट, भैरवनाथाचं चांगभलं" असा जयघोष करत भाविकांनी तळीभंडार केला.

थापलिंग गडावर सोमवारी (दि. १३ ) पहाटे श्रीखंडोबा देवाची पहाटे विधीवत पूजा व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सकाळी थापलिंग गडावर चोहोबाजूंनी भाविक येण्यास प्रारंभ झाला. दुपारी १२ नंतर भाविकांची गर्दी वाढली. थापलिंग गडावर भाविकांनी येऊन कुलदैवताचा कुलाचार म्हणून वाघे मंडळींकडून जागरण गोंधळ पूर्ण करून घेतला. "सदानंदाचा येळकोट", भैरवनाथाचं चांगभलं " असा जयघोषात लाखो भाविकांनी तळी भंडार केला व खोबऱ्याची उधळण केली. दुपारी दोन वाजता वळती, रांजणी, शिंगवे, येथील खुडे बंधूंच्या मानाच्या काठी पालख्यांचे पारंपारिक वाद्यांच्या गजरात गडावर आगमन झाले. दिवसभरात जवळपास एक लाखाहून अधिक भाविकांनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले.

थापलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष देवदत्त निकम यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे पदाधिकारी व ग्रामस्थ, तरुण, युवक यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत. थापलिंग गडावर खंडोबा देवाच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू झाले आहे.या मंदिराच्या कामासाठी भाविक भक्तांनी सरळ हाताने मदत करावी, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. यात्रेत काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## बनावट दाखले देणारे रॅकेट उद्ध्वस्त

**जुन्नर :** उत्पन्नाचे बनावट दाखले देणाऱ्याविरुद्ध जुन्नर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती पोलिस निरीक्षक किरण अवचर यांनी दिली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीच्या दुकानातील इतर व्यक्तींचे दाखले तसेच बनावट दाखले बनविण्यास लागणारे साहित्य ताब्यात घेण्यात आले आहे.

जुन्नर येथील शंकरपुरा पेठेतील रामकृष्ण हरी लॉटरी सेंटर येथे बनावट दस्तऐवज तयार करत आहेत. अशी माहिती महसूल विभागाचे निरीक्षण अधिकारी ज्ञानेश कुलकर्णी व पुरवठा निरीक्षक दीपक मडके यांना गुरुवारी (दि. ९) रोजी सायंकाळी मिळाली. त्यानंतर कुलकर्णी यांनी शुक्रवारी (दि. १०) तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांच्या आदेशानुसार जुन्नर पोलिसांना माहिती दिली. दरम्यान, त्यानंतर निरीक्षण अधिकारी ज्ञानेश कुलकर्णी, सहायक पोलिस निरीक्षक एस. के. मोरे व पुरवठा निरीक्षक दीपक मडके दोन साक्षीदार यांच्यासह रामकृष्ण लॉटरी सेंटर शंकरपुरा पेठ जुन्नर येथे आले. त्यावेळी तेथे आरोपी विनोद बिडवई हा बनावट उत्पन्नाचे दाखले देत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

# मयुरेश मेटकरीचा जागतिक विक्रम!

## २ तास ३१ मिनिटे मकरासन करून आंतरराष्ट्रीय विक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**वालचंदनगर :** श्री वर्धमान विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील इ. सहावीचा विद्यार्थी मयुरेश ज्ञानदेव मेटकरी याने इंटरनॅशनल योगा बुक ऑफ रेकॉर्ड साठी तब्बल २ तास ३१ मिनिटे मकरासन (क्रोकोडाइल पोज) हे आसन करून आंतरराष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. या विक्रमाची नोंद इंटरनॅशनल योगा बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये घेतली जाणार आहे. रिचा कुंभाकर, छत्तीसगड येथील २२ वर्षीय तरुणीचा दोन तास मकरासन करण्याचा विक्रम मयुरेशने मोडत, आंतरराष्ट्रीय विक्रमाला गवसणी घातली आहे.

मयुरेश हा गरीब शेतकरी कुटुंबातील असून हुशार व नम्र विद्यार्थी आहे. लहानपणापासूनच मयुरेशला योगासन करण्याची आवड व प्रेरणा त्याच्या वडिलांकडून मिळालेली आहे. या विक्रमासाठी त्याने गेले काही महिने अथक परिश्रम व कठोर सराव करून यश संपादित केले आहे. हे यश संपादित करण्यासाठी वडील ज्ञानदेव मेटकरी यांचा सिंहाचा वाटा असून प्राचार्य हनुमंत कुंभार यांच्या कल्पनेतून व विशेष प्रयत्नातून मयुरेशला व्यासपीठ उपलब्ध झाले.

तसेच शाळा समिती अध्यक्ष मकरंद वाघ, उपाध्यक्ष प्रशांत महामुनी, उप मुख्याध्यापक अरुण निकम, उपप्राचार्य रामनाथ नाकाडे, पर्यवेक्षक शिवप्रसाद कुलकर्णी, पर्यवेक्षक अनिल उबाळे, भारत चिल्ड्रेन अकॅडमीचे प्राचार्य कृष्णदेव क्षीरसागर, वर्गशिक्षक सुरज मोरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच क्रीडा शिक्षक नितीन कुलकर्णी यांनी या रेकॉर्डच्या ऑनलाईन नोंदणी पासून ते हा कार्यक्रम पूर्ण होई पर्यंत मार्गदर्शन व सहकार्य केले त्याचप्रमाणे अरविंद देठे, ज्ञानेश्वर किसवे यांनी सहकार्य व नियोजन केले.

या प्रसंगी नामदार दत्तात्रय भरणे हे उपस्थित होते. त्यांनी या आंतरराष्ट्रीय विक्रमासाठी मयुरेशला शुभेच्छा दिल्या व उपस्थित विद्यार्थ्यांना मयुरेशचा आदर्श व प्रेरणा घेऊन शैक्षणिक व विशेष करून क्रीडा विभागात दैदिप्यमान कामगिरी करावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी इंदापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन खुडे, लासुर्णे प्राथमिक आरोग्य अधिकारी डॉक्टर प्रज्ञा लोंढे, अस्थिरोगतज्ञ नितीन लोंढे, टाईम कीपर म्हणून क्रीडा शिक्षक अरविंद देठे, विजयसिंह पाटील, क्रीडा शिक्षिका ए.यु. रणवरे, योगाचार्य रवींद्र वेदपाठक व विशेष गॅझेटेड अधिकारी दत्तात्रय बिडकर-वरिष्ठ अभियंता,विक्रम साराभाई स्पेस सेंटर, विद्यालयाचे शिक्षकवृंद, मयुरेशचे कुटुंबीय, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## सोनवडीत वन्यप्राण्यांकडून ज्वारीच्या पिकाची नासाडी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** सोनवडी सुपे (ता. बारामती) येथील शेतकरी हारुण सय्यद यांच्या शेतातील दीड एकर ज्वारीचे पिक ससे व हरणांनी फस्त केले आहे. या पिकाची वनविभाग व कृषी विभागाच्या अधिका-यांकडून पाहणी करुन पंचनामा करण्यात आला. येथील गट ८१ मध्ये हारुण अहमद सय्यद यांची सहा एकर ज्वारीचे पिक आहे. ज्वारीचे पिक पोटरी अवस्थेत आल्यानंतर वन्यप्राणी ससे व हरणांनी पिक खाऊन नुकसान केले आहे.

या पिकाची पाहणी नुकतीच वनविभागाच्या वनरक्षक जयश्री पवार व कृषी सहाय्यक संकेता शिंदे यांनी केली व घटनेचा पंचनामा केला. यावेळी वनमजूर - जी एन भोंडवे, एस. पी. दिवटे तसेच शेतकरी हारुण सय्यद व आमिन सय्यद उपस्थित होते. या पाहणीत ज्वारीच्या पिकात वन्य प्राणी - ससे व हरणांच्या पायांचे ठसे तसेच विष्ठा आढळून आली आहे. वन्यप्राण्यांकडून ज्वारीच्या पिकाचे झालेली नुकसान भरपाई वनविभागाने तातडीने द्यावी, अशी मागणी हारुण सय्यद यांनी वनविभागाकडे लेखी स्वरुपात केली आहे.



## संरक्षक भिंतीवरून सपकळवाडी येथे मारहाण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** शेतीच्या बांधावर सरंक्षिक भिंतीचे बांधकाम करीत असल्याच्या कारणावरून लाकडी दांडके व कोयत्याने मारहाण करण्याची घटना घडली आहे. ही घटना इंदापूर तालुक्यातील सपकळवाडी येथे घडली आहे. याबाबत उमेश वालचंद सपकळ यांनी वालचंदनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी शशिकांत निंबाळकर, आकाश मोरे, सूरज मोरे, सुनीता मोरे, हंसराज मोटे, आदित्य मोटे, अनिकेत मोटे, सुजित सूळ, नितीन तरंगे, सुरेखा मोटे या १० जणांच्या विरोधात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सपकळवाडी या ठिकाणी आई, पत्नी व दोन मुलांसह वास्तव्यास असून सणसर सपकळवाडी गावच्या हद्दीमध्ये गट नं. ७८८ मध्ये डाळिंबाची बाग आहे. या बागेतून डाळिंबाची चोरी होत असल्याने बागेला मंगळवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास संरक्षक भिंत करण्याचे काम सुरू केले होते. यावरून वरील १० जणांनी उमेश सपकळ यांच्यासह त्यांच्या आई सीता, पत्नी कोमल, तसेच दोन मुले चेतनराजे व संभाजीराजे यांना दगड, लाकडी दांडके व कोयत्याने मारहाण केली.

या वादामध्ये उमेश सपकळ यांच्या गळ्यातील सोन्याची चेन कोणीतरी ओढून नेली. या हाणामारीत उमेश सपकळ यांच्या डोक्याला व कुटुंबातील इतर सदस्यांनादेखील मार लागला असून ते इंदापूर येथील शासकीय रुग्णालयामध्ये उपचार घेत आहेत.


## २७ तासांत सायकलवरुन अष्टविनायक वारी

**कारेगाव :** भांबर्डे, ता. शिरुर येथील अप्पा पवार यांनी सुमारे २७ तासात सायकलवर अष्टविनायकाचे दर्शन पूर्ण करण्याचा यशस्वी उपक्रम नुकताच पूर्ण केला आहे.

पवार यांनी सर्वप्रथम सिद्धटेक, जि.अहिल्यानगर येथील गणपतीच्या मंदिरात सकाळी साडेअकरा वाजता पोहचून दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी मोरगावच्या गणपतीच्या दिशेने प्रवास करुन दुपारी दीड वाजता मोरगावच्या गणपतीचे दर्शन घेतले, त्यानंतर जेजुरी मार्गे ते दुपारी पावणे चार वाजता थेऊरच्या गणपतीचे दर्शन घेऊन त्यांनी महाडच्या गणपतीच्या प्रवासास सुरवात केली. पुणे शहरातून बाहेर पडल्यावर जुन्या मुंबई पुणे महामार्गाने महाड येथील गणपतीचे रात्री दहा वाजता दर्शन घेतले. तिथे मुक्काम करून सकाळी साडेआठ वाजता पालीच्या गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर पुढे लेण्याद्री व ओझर गणपतीच्या दिशेने प्रवासास सुरुवात केली.

पाली गणपती वरून प्रवास करत करत महाडच्या गणपतीच्या दिशेने महाड येथे येऊन, परत जुना मुंबई पुणे मार्गे खोपोलीचा घाट हा अवघ्या ४५ मिनिटांत चढाई करून लोणावळा मार्गे पुढील प्रवासास पुण्याला निघाले. खंडाळा लोणावळा कामशेत व तळेगाव दाभाडे येथून सायकलने चाकणच्या प्रवासाला सुरुवात केली.

तळेगाव दाभाडे ते चाकण हे अंतर अवघ्या एक तासामध्ये पूर्ण केले. तसेच चाकण ते नारायणगाव लेण्याद्री व ओझर हे अंतर दोन तास ५० मिनिटांमध्ये पूर्ण केले. प्रथम लेण्याद्री गणपतीचे दर्शन घेवून पुढे ओझरच्या गणपतीचेही दर्शन घेतले. त्यानंतर सर्वात शेवटी रात्री साडे नऊ वाजता अष्टविनायक रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन घेतले आणि सायकलवरील अष्टविनायक दर्शन मोहिम पुर्ण केली. या मोहिमेसाठी उद्योजक नितीन दौंडकर यांनी आठ हजार रुपये किमतीची सायकल भेट दिल्याचे पवार यांनी बोलताना सांगितले. दरम्यान, पवार यांनी यापूर्वी कळसूबाई शिखर सह राज्यातील अनेक गड किल्ल्यांची चढाई पुर्ण केली आहे.



भांबर्डे, ता. शिरुर येथील सायकलवरुन अष्टविनायक यात्रा पुर्ण करणारे अप्पा पवार. (छायाचित्र - पोपट पाचंगे.)

# पत्रकारांनी चांगल्या कामाचे कौतुक करावे : क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**लोणी देवकर :** भारतीय लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पत्रकारिता ओळखली जाते. यामध्ये पत्रकार हे समाजमनाचा आरसा आहेत. पत्रकारांनी जिथे चूक किंवा अन्याय होतो, तिथे जरूर लिहिले पाहिजे; मात्र जिथे चांगले काम होते तिथे कौतुकदेखील केले पाहिजे. पत्रकार भवन होण्यासाठी तालुक्यातील पत्रकारांनी एक होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन क्रीडा तसेच अल्पसंख्याकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या इंदापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त इंदापूर पंचायत समितीच्या लोकनेते शंकरराव‍जी पाटील सभागृहात आयोजित पत्रकार दिन विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. तर मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा समारोप झाला. अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष एम. डी. शेख यांच्या मार्गदर्शना खाली हा कार्यक्रम झाला.

पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार संघाच्या दैनंदिन कामासाठी इंदापूर बस स्थानकासमोरील सार्वजनिक बांधकाम विभागाची जुनी इमारत भाडे तत्त्वावर द्यावी, असे निवेदन मंत्री भरणे यांना देण्यात आले. भरत शहा म्हणाले, शहर विकासासाठी पत्रकारांचे महत्वपूर्ण योगदान असून नगरपरिषदेच्या मालकीचे सुसज्ज पत्रकार भवन बांधून दिले जाईल. यावेळी अ‍ॅड. राहुल मखरे, छत्रपती कारखान्याचे माजी अध्यक्ष अविनाश घोलप, अ‍ॅड. शुभम निंबाळकर, किरण गानबोटे, पांडुरंग शिंदे, गफुर सय्यद, शकील सय्यद, नंदकुमार गुजर, अरविंद वाघ, धरमचंद लोढा, विधीज्ञ गिरीष शहा, दत्तात्रय अनपट यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. संदेश शहा, जेष्ठ पत्रकार तानाजी काळे, महेश स्वामी, विधीज्ञ नारायण ढावरे, कैलास पवार यांनी पत्रकारांच्या अडचणीकडे सर्वांचे लक्ष वेधले.

## एमआयटी एडीटीत सरकारी अभियोक्त्यांचे मार्गदर्शन

# सरकारी अभियोक्ता हे न्यायव्यवस्थेचा आधारस्तंभ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** आजपर्यंत अनेक गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये सरकारी अभियोक्त्यांनी (वकिलांनी) आपल्या अशिलाची चांगल्या पद्धतीने बाजू मांडून त्यांना न्याय देण्याचे काम केले आहे. त्यामुळे, सरकारी अभियोक्ता हे न्यायव्यवस्थेचा आधारस्तंभ असून, त्यांच्या कार्यामुळे लोकांचा न्यायालयीन प्रक्रियेवरील विश्वास दृढ होतो, असे मत विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी मांडले.

ते येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या स्कुल ऑफ लॉ तर्फे आयोजित ‘सरकारी अभियोक्ता आणि कायदेशीर सुधारणा’ या विषयावर आयोजित मार्गदर्शन सत्राच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते. या सत्रात २० सरकारी अभियोक्त्यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या सत्रासाठी, सुप्रिया मोरे (सहाय्यक संचालक आणि सरकारी अभियोक्ता), विजयसिंह जाधव, स्कूल ऑफ लॉच्या डीन डॉ.सपना देव आदी मान्यवर उपस्थित होते. सत्रातील प्रमुख अतिथी सुप्रिया मोरे देसाई यांनी सरकारी अभियोक्ता होण्यासाठी आवश्यक प्रक्रिया, परीक्षेची तयारी, तसेच या भूमिकेचे महत्त्व यावेळी विद्यार्थ्यांना स्पष्ट केले. याशिवाय, विजयसिंह जाधव यांनीही सरकारी अभियोक्त्याची सामाजिक बांधिलकी यावेळी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. तर डॉ. देव यांनी “आमचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना कायद्याच्या क्षेत्रात सक्षम आणि जबाबदार अधिकारी बनवणे आहे,” असे सांगितले.

याप्रसंगी स्कुल ऑफ लॉच्या वतीने सरकारी अभियोक्ता परीक्षेच्या तयारीसाठी विशेष केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली. या केंद्रात प्रकरणांचे अभ्यास, न्यायालयीन प्रक्रियांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण, आणि परीक्षेची सखोल तयारी यावर भर दिला जाणार आहे.

# अंधत्वावर केली मात

**वयाच्या बावीसाव्या वर्षी त्याने दृष्टी गमावली. आज वयाच्या ३१ व्या वर्षी तो सत्र न्यायाधीश आहे. ब्रह्मानंद शर्मा असं या तरूणाचं नाव आहे. दृष्टी गेली तरी त्याने आत्मविश्वास हरवू दिला नाही. अनेक आव्हानांचा सामना करत त्याने हे यश मिळवलं आहे.**




ब्रह्मानंद शर्मा फक्त २२ वर्षांचा होता जेव्हा त्याला काचबिंदूचं निदान झालं. यामुळे त्याची दृष्टी गेली. दृष्टी गेली तरी त्याचा दृष्टीकोन बदलला नाही. न्यायाधीश बनण्याचं स्वप्न त्याने डोळ्यात साठवून ठेवलं होतं. हे स्वप्न तो जगला. वयाच्या ३१ व्या वर्षी तो सत्र न्यायाधीश बनला. राजस्थानातला तो पहिला अंध न्यायाधीश आहे. अजमेर जिल्ह्यातल्या सारवार तालुक्यात त्याची बदली झाली आहे. ब्रह्मानंद मूळचा भिलवाड्याचा सरकारी शाळेत त्याचं शिक्षण झालं. न्यायाधीशांच्या नेमणुकीसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत तो पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाला. २०१३ मध्ये तो ही परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याचा प्रत्येक दिवस कोर्टकचेरीच्या कामात जातो. दिवसभर तो कामात असतो. इतर न्यायाधीशांप्रमाणे तो कागदपत्रं वाचू शकत नाही. पण नंतर तो नंतर रेकॉर्डिंग ऐकतो. यातला शब्दन शब्द तो काळजीपूर्वक ऐकतो. काही चुकू नये असा त्याचा प्रयत्न असतो. ब्रह्मानंदचं हे यश खूप मोठं आहे. त्याच्या या प्रयत्नांमधून आपण प्रत्येकाने धडा घ्यायला हवा. पण भारताच्या न्यायप्रणालीतल्या त्रुटीही यानिमित्ताने समोर आल्या आहेत. अंध व्यक्तींना या क्षेत्रात येण्यासाठी कोणत्याही सुविधा नाहीत ही बाब यानिमित्ताने समोर आली आहे. न्यायाधीश पदाच्या परीक्षेच्या निमित्ताने त्याला बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला. तो प्रशिक्षण केंद्रातही गेला. तर तिथल्या शिक्षकांनी कोणतीही मदत करायला नकार दिला. कुटुंबियांनी त्याला खूप मदत केली. त्यातही त्याला त्याच्या पत्नीची मदत मिळाली. त्याची पत्नी पुस्तकं वाचून दाखवत असे. याचं रेकॉर्डिंग केलं जायचं. मग ब्रह्मानंद हे रेकॉर्डिंग ऐकत असे.

परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदभार कधी स्वीकारायला मिळणार याची तो वाट पाहत होता. त्यावेळी आधी त्याला प्रशिक्षण द्यायला हवं, असं उच्च न्यायालयाने सुचवलं. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर २०१६ मध्ये त्याने पदभार स्वीकारला. सर्वात पहिल्यांदा तो चित्तौडगडमध्ये रूजू झाला. नंतर त्याची बदली अजमेरमधल्या सारवार तालुक्यात झाली. ब्रह्मानंदने त्याच्या कॉम्प्युटरला ई स्पीक रिडर बसवला आहे. रिडरने काढलेल्याा नोट्स यात रेकॉर्ड होतात आणि संवादाच्या रूपात सादर होतात. हे रेकॉर्डिंग ऐकून ब्रह्मानंद निकाल देतो. अपयशाची छोटी छोटी कारणं देणाऱ्यांनी ब्रह्मानंदकडून बरंच काही शिकायला हवं.

अचिव्हर

# डेनिम जॅकेटचा स्टायलिश अंदाज

डेनिम नेहमीच फॅशनमध्ये असतं. त्यामुळे जीन्स आणि जॅकेट्स आपल्या वॉर्डरोबमध्ये हवेतच. फॅशन असो किंवा थंडीपासून बचाव करायचा असो डेनिम जॅकेट तुम्हाला सगळ्या वेळेस उपयोगी पडतं. थंडीमध्ये डेनिम जॅकेट कॅरी करण्याची संधी मिळते. हे जॅकेट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करता येतं. हे जॅकेट कॅरी करण्याची स्टाईल तुमच्या लूकला चार चांद लावू शकते. डेनिम जॅकेट कॅरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींविषयी...



✻ तुमच्याकडे बरेच प्रिंटेड शर्ट असतील. थंडीत स्टायलिंगचं तंत्र जपताना अशा प्रिंटेड शर्टची मदत तुम्ही घेऊ शकता. प्रिंटेड शर्टवर डेनिम जॅकेट कॅरी करा. काळ्या पँटवर प्रिंटेड शर्ट घालून डेनिम जॅकेट कॅरी करा. बाहेर पडताना स्टायलिश गॉगल घाला.

✻ चिनोज आणि डेनिम जॅकेट हे कॉम्बिनेशनही बेस्ट आहे. डेनिम जॅकेट जीन्सवर किंवा साध्या पँटवर शोभून दिसतं असं तुम्ही समजत असाल तर ते चुकीचं आहे. हे जॅकेट चिनोजवरही शोभून दिसतं. चिनोजवर शर्ट किंवा टी शर्ट घाला. त्यावर जॅकेट परिधान करा आणि भटकंतीला निघा.

✻ फॉर्मल पँटवरही हे जॅकेट घालता येईल. स्मार्ट कॅज्युअल्स ही संकल्पना सध्या प्रचलित आहे. ट्राउझरवर डेनिम घालून तुम्ही तुमचा लूक खुलवू शकता.


✻ वीकेंड पार्टीसाठी कूल लूक मिळवायचा असेल तर डेनिम जॅकेट आणि जॉगर्स कॅरी करा. जॉगर्सवर स्ट्राईप्सवाला टी शर्ट घाला. डेनिम जॅकेट कॅरी करा आणि मस्त दिसा.

फॅशन पॅशन

# व्यायामाला सुरूवात करताना...

वजन कमी करण्यासाठी सगळ्यांकडून सल्ले मिळत असतात. पण वजन कमी करताना शास्त्रशुद्ध पद्धतीनेच व्यायाम केला पाहिजे. व्यायामाला सुरूवात करताना वजन कमी करण्यासाठी काय करायला हवं, ट्रेडमिलवर किती वेळ चालायला हवं, नेमकं काय खायला हवं असे प्रश्न पडू लागतात. या प्रवासाची सुरूवात करताना मनात थोडी धाकधूक असते. ही धाकधूक दूर करण्याचा हा एक प्रयत्न....

✻ वजन कमी करण्यासाठी कार्डिओ व्यायाम सर्वोत्तम आणि पुरेसा असल्याची जाहिरात केली जाते. मात्र प्रत्यक्षात हा व्यायामाची उपकरणं विकणाऱ्या कंपन्यांचा फंडा आहे. कार्डिओ व्यायामाची उपकरणं बरीच महाग असतात. त्यामुळे त्यांच्या विक्रीसाठी अशा पद्धतीचा प्रचार केला जातो. मात्र प्रत्यक्षात विविध व्यायामप्रकार उपयुक्त ठरतात.



✻ कमीतकमी वेळात जास्तीत जास्त फॅट्स जाळण्यासाठी आहार, वेट ट्रेनिंग आणि कार्डिओ यांचा समतोल साधणं गरजेचं आहे असंही सांगितलं जातं. कार्डिओमुळे वजन कमी होत असलं तरी फक्त कार्डिओवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यातच बरंच वजन कमी करायचं असेल तर फक्त कार्डिओ करून भागणार नाही. धावणं, सायकलिंगसारखे व्यायामप्रकार सातत्याने करत राहिल्यास शरीर या तुलनेने कमी तीव्रतेच्या व्यायामप्रकारांशी जुळवून घेतं आणि कमी कॅलरी खर्च होतात.

✻ वजन लवकर कमी करायचं असेल तर किक बॉक्सिंग, स्प्रिंटिंगसारखे अधिक तीव्रतेचे कार्डिओ व्यायाम करता येतील. यामुळे स्ट्रेंथ ट्रेनिंगही होतं आणि वजन कमी करण्याला गती मिळते.

✻ वजन कमी करायचं असलं तरी अतिव्यायाम करू नये. शरीराला विश्रांती न देताना सतत व्यायाम करत राहिल्यामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतं. शिवाय मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. स्नायूंमध्ये वेदना होणं, भूक मंदावणं, डोकेदुखी, रोगप्रतिकारक्षमता कमी होणं असे दुष्परिणाम समोर येतात.

फिटनेस

# वादांना वैतागलोय

माझं एका मुलीवर चार वर्षांपासून प्रेम आहे. पण सध्या आमच्या आयुष्यात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मी कामानिमित्ताने जर्मनीत असतो. पुढची तीन वर्षं इथेच राहणार आहे. मी वेळ देत नाही, असा तिचा समज झाला आहे. ती माझ्यावर चिडलेली असते. खूप कठोरपणे वागते. ताणतणाव, अस्वस्थता अशा मानसिक विकारांनी तिला ग्रासलं आहे. ती या सगळ्यासाठी मला दोष देते आहे. मला काही काळासाठी एकटं सोड, असं तिने मला सांगितलं आहे. अर्थात तिला किती वेळ एकटं रहायचं आहे हे मला माहीत नाही. ती माझ्याशी बोलत नाही. मी तीन वर्षांनी भारतात परतल्यानंतर आम्ही लग्न करणार होतो. पण सध्या आमच्यात तणाव निर्माण झाला आहे. आमच्यात सध्या संपर्क नाही. या सगळ्याचा मला खूप ताण आला आहे.



मी अस्वस्थ झालो आहे. मी काय करू?

**उत्तर** : तुम्हा दोघांमध्ये सध्या संपर्क होऊ शकत नाही. तू सध्या कोंडीत सापडला आहेस. संपर्काशिवाय ही कोंडी फुटणार नाही. त्यामुळे तू तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न कर. तिने तुला बोलायला मनाई केली असली तरी मेसेज, व्हॉट्स ॲप, ई मेलच्या माध्यमातून तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न कर. तू मित्रमैत्रिणींना मध्यस्थी करायला सांग. तुम्हा दोघांना ओळणाऱ्या मित्रमैत्रिणींना तिच्याशी संपर्क करायला सांग. तिच्याशी संपर्क झाला तरच तुमच्या नात्याची गाडी पुढे सरकेल. तू तिच्याशी बोल. तिच्या अपेक्षांविषयी जाणून घे. तुझ्या कामाच्या स्वरुपाविषयी सांग. तीन वर्षांनंतर परत आल्यावर आपण लग्न करू आणि तुझं तिच्यावर खूप प्रेम असल्याचं तिला समजावून सांग. तिची मनधरणी करण्याचा प्रयत्न कर. ही कोंडी संवादामुळेच सुटू शकेल.

मॅच मेकिंग

# चलो, निकल पडो

मित्रांनो, हिवाळ्यात भटकंतीची मजाच न्यारी. त्यात बरोबर धमाल मित्र असतील तर विचारायलाच नको. आता भटकंती करायची तर ठिकाणंही खास हवीत. काही ठिकाणी मुलांची गँग खूप धमाल करू शकते. तुम्हीही मित्रांसोबत भटकंतीला निघण्याच्या तयारीत असाल तर या ठिकाणांचा नक्कीच विचार करा.

✻ लडाख ट्रिपला निघा. डिसेंबर–जानेवारीमध्ये लडाख गोठलेलं असतं. पण थंडी कमी झाल्यावर तुम्ही लेह–लडाखला जाऊ शकता. बाईक किंवा कारने लेह–लडाखला जाता येईल. मस्तपैकी मजा मस्ती करत, निसर्गसौंदर्य न्याहाळत तुम्ही भटकंती करू शकाल.

✻ ऋषीकेश हे अत्यंत पवित्र स्थान आहे. ऋषीकेश हे शांत आणि धार्मिक स्थान आहे. इथे गेल्यावर मन:शांती मिळू शकेल. महानगरातल्या धकाधकीच्या जीवनातून काही काळ ब्रेक घ्यायचा असेल तर ऋषीकेशची सैर करा.

✻ डिसेंबर–जानेवारी महिन्यात हिमाचल प्रदेशची सैर करता येईल. या दिवसात इथे बर्फ पडतो. सिमला, कुलू–मनालीशिवाय इथे इतरही बरीच ठिकाण आहेत. इथे शांत आणि निवांत क्षण अनुभवता येतील.

✻ या दिवसात समुद्रकिनाऱ्यांची सफर करता येईल. कोकण, कर्नाटकचा किनारी भाग, तमिळनाडू, केरळ या राज्यांचा दौरा करता येईल. गोवा हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे. त्यामुळे आपला ग्रुप जमवा आणि भटकंतीला निघा.

भटकंती



# सेवा वाहतूक सेवेची मुहूर्तमेढ

दोस्तांनो, सध्या खूप शिकूनही मनासारखी नोकरी मिळत नाही. एखादी नोकरी मिळालीच तर पगार कमी असतो. अशावेळी स्वत:चा एखादा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना वाईट नाही. उद्योग–व्यवसायाची सुरूवात करताना संघर्ष करण्याची तयारी ठेवायला हवी. तुम्हाला लगेच यश मिळत नाही. पण एकदा यश मिळाल्यावर तुम्ही चांगलं उत्पन्न मिळवू शकता.



सध्या ट्रॅव्हल अँड टूरिझमला चांगले दिवस आले आहेत. तुम्ही वाहन चालवू शकत असाल तर हा व्यवसाय सुरु करता येईल. सध्या लोकांना एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी गाडी लागते. सहलींसाठीही गाड्यांची गरज असते. त्यामुळे सुरूवातीला तुम्ही तुमच्याकडच्या गाडीने सुरूवात करू शकता. तुमचं चांगलं नाव झाल्यावर पुढे जाऊ शकता. नव्या गाड्या खरेदी करून व्यवसाय वृद्धी करता येईल. वाहतूक सेवा क्षेत्र आज वेगाने विस्तारत आहे. व्यवसायिक कारणांमुळे प्रवास करणाऱ्यांची संख्याही खूप मोठी आहे. या माध्यमातून तुम्ही चांगलं उत्पन्न मिळवू शकता. छोट्या प्रमाणावर सुरूवात करून विस्तार करू शकता. ओला, उबेरसारख्या कंपन्याही संधी देत आहेत. या माध्यमातून तुम्ही प्रवासी जोडू शकता आणि स्वतंत्र व्यवसायची मुहुर्तमेढ रोवू शकता.

स्वयंरोजगार




## शेर की जुबानी

* चाहे हजार शिकवे हो उनसे,
चाहे हो कई दिनोंकी बेरुखी,
बस उनकी एक झलक और छोटी सी हंसी,
फिर बस भुला देते हैं हम,
सब खुशी खुशी।

* कोशिश करो कोई आपसे
ना रूठे, जिंदगी में अपनों का
साथ ना छुटे, दोस्ती कोई भी
हो उसे ऐसे निभाओ,
की उस दोस्ती की डोर,
जिंदगी भर ना तुटे।

* कुछ उलझे हुए सवालों
से डरता है दिल, किसी को पाना कोई बडी
बात नहीं, बस दोस्तों को खोने से डरता है दिल।

## व्हॉट्स न्यू?

### स्मार्ट वॉच वापरताना...



दोस्तांनो, तुमच्याकडे स्मार्ट वॉच आहे का? मग त्यातले काही छुपे फीचर्स जाणून घेऊन अधिक चांगल्या पद्धतीने वापर करण्याचा प्रयत्न करा.

✻ स्मार्ट वॉचमधली आवडती ॲप्स पिन करता येतील. यासाठी काही सेकंद ॲपवर बोट धरून ठेवा. आता हे ॲप मेनूमध्ये वरच्या बाजूला दिसेल. त्याला स्टारही जोडला जाईल. यामुळे संबंधित ॲप पटकन सापडेल.

✻ स्मार्ट वॉच वायफायशी जोडून आवडीची ॲप्स डाऊनलोड करता येतील.

✻ स्मार्ट वॉचमध्ये आवडीच्या फीचर्ससाठी शॉर्टकट क्रिएट करता येईल.

## ॲप वर्ल्ड

### खरेदी स्मार्ट स्पीकर्सची



✻ स्मार्ट स्पीकरना इंग्रजी भाषेत कमांड द्यावी लागते. आपले उच्चार या स्पीकरला कळत नाहीत. त्यामुळे स्पीकर खरेदी करण्याआधी तो वापरून बघा.

✻ बऱ्याच स्मार्ट स्पीकर्सना वायफायची गरज असते. त्यामुळे तुमच्या घरी वायफाय असेल तरच असे स्पीकर विकत घ्या.

✻ गाणी ऐकण्यासाठी स्पीकर खरेदी करत असाल तर स्मार्ट स्पीकरऐवजी साधा स्पीकर घ्या.

✻ स्मार्ट स्पीकर चालवण्यासाठी ॲपची गरज असते. त्यामुळे तुम्हाला फोनमध्ये ॲप डाउनलोड करावं लागेल.

या सगळ्या गोष्टींचा विचार करूनच मग स्मार्ट स्पीकर घ्या

## स्मार्ट टिप्स

### बंद लॅपटॉपने करा मोबाईल चार्ज



दोस्तांनो, बंद लॅपटॉपचा वापर करूनही तुम्ही मोबाईल चार्ज करू शकता. यासाठी माय कॉम्प्युटर–फाईल मॅनेजर–प्रॉपर्टीज या ऑप्शनमध्ये जा. मग कंट्रोल पॅनेल–होम डिव्हाइस मॅनेजरची निवड करा. आता तुम्हाला वेगवेगळे ऑप्शन्स दिसतील. त्यातल्या युनिव्हर्सल सिरियल बस कंट्रोलर्स हा पर्याय निवडा. आता यूएसबी रूट हबवर क्लिक करा. आता प्रॉपर्टीज–पॉवर मॅनेजमेंटमध्ये जा. आता अलाउ द कॉम्प्युटर टू टर्न ऑफ धीस डिव्हाइस टू सेव्ह द पॉवर हा ऑप्शन डिसेबल करा. आता लॅपटॉप बंद असेल तरी तुम्ही फोन चार्ज करू शकता.

## स्मार्ट ट्रिक्स


### वायफाय 'स्लो' झालंय?




घरातल्या वायफायची गती कमी झाली की डाउनलोडिंग होत नाही. व्हिडिओ बघता येत नाहीत. अशा परिस्थितीत वायफायची गती वाढवण्यासाठी काही उपाय करता येतील. योग्य फ्रिक्वेंसी निवडा. वायफायचं फर्मवेअर अपडेट करा. सॉफ्टवेअरचं अपटेड पेंडिंग असेल तर समस्या निर्माण होऊ शकतात. सिग्नलशी संबंधित समस्या असतील तर रिपीटर्सचा वापर करू नका.

# चटपटीत मटार चाट

मित्रांनो, चाटचे प्रकार सगळ्यांनाच आवडतात. पण नेहमीच्या या चाटमध्ये काही प्रयोग करून पाहायला हवेत. आता मटारचा हंगाम सुरू होईल. चला तर मग, मटार चाटची रेसिपी जाणून घेऊ.



**साहित्य** :पाव किलो मटारचे दाणे, दोन कांदे, दोन टोमॅटो, दोन ते तीन हिरव्या मिरच्या, एक इंच आलं, चमचाभर हळद, चाट मसाला, जीरेपूड, लाल तिखट, मीठ, चिंचेची चटणी, दही, शेव आणि कोथिंबिर

**कृती** : मटार उकडून घ्या. हे मटार भांड्यात काढून घ्या. आता प्रत्येक प्लेटमध्ये प्रत्येकी दोन चमचे मटार घाला. त्यावर चिरलेला कांदा,टोमॅटो, हिरवी मिरची, किसलेलं आलं, चाट मसाला, लाल मिरची, जिरेपूड आणि मीठ घाला. त्यावर थोडी शेव घाला. मग चिंचेची चटणी, दही घाला. कोथिंबिरीने सजवा. मटार चाट तयार आहे. एखाद्या संध्याकाळी हा बेत करता येईल.

झटपट रेसिपी

## At a Glance

### संपाचा बेस्ट वाहतुकीवर परिणाम

**मुंबई :** बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाने नेमलेल्या खासगी ऑपरेटरच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सोमवारी पहाटे मुंबईतील एका आगारात अचानक संप पुकारल्याने बेस्ट बससेवेवर अंशत: परिणाम झाला.

बेस्टने संपाचे कारण जाहीर केले नसले तरी खासगी ऑपरेटरच्या अधिकाऱ्यांनी गरोदर महिला कंडक्टरशी गैरवर्तन केल्याने हा संप झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

### मुख्यमंत्री आतिशी आज अर्ज भरणार

**नवी दिल्ली :** : दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी कालकाजी विधानसभा मतदारसंघातून सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करू शकल्या नाहीत. त्या मंगळवारी अर्ज दाखल करणार आहेत. ज्येष्ठ नेते मनीष सिसोदिया यांच्यासमवेत आतिशी यांनी गिरी नगर येथील गुरुद्वाराचे दर्शन घेतल्यानंतर रोड शो केला.

### दिल्लीत २१ कोटींची रोकड जप्त

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू झाल्यापासून आठवडाभरातच विविध विभागांनी २१ कोटी रुपयांहून अधिक किमतीची रोकड आणि दारूसारख्या इतर वस्तू जप्त केल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सोमवारी दिली. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच ७ जानेवारीरोजी आचारसंहिता लागू करण्यात आली.

# एआयमुळे १२ दशलक्ष नोकऱ्या कालबाह्य

## वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या अहवालातील : धक्कादायक माहिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या फ्युचर ऑफ जॉब्स अहवाल २०२५ मध्ये देशभरात २०३० पर्यंत१७० दशलक्ष नवीन नोकऱ्या निर्माण होतील. त्याचवेळी एआय मुळे १२ दशलक्ष नोकऱ्या या कालबाह्य होतील, असे म्हटले आहे. पुढील पाच वर्षांत नोकऱ्यांमधील भविष्याचा आढावा घेणारा अहवाल वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने प्रसिद्ध केला आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने 'फ्यूचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५' चा अहवाल प्रसिद्ध केला आहे. यात २०३० पर्यंतची रोजगारक्षमतेवर प्रकाश टाकला आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, लोकसंख्याशास्त्रीय बदल, भू-आर्थिक तणाव आणि आर्थिक दबाव हे या बदलांचे प्रमुख घटक आहेत. जगभरातील उद्योग आणि व्यवसायांना आकार देत आहेत, असेही या अहवालात म्हटले आहे.

१,००० हून अधिक कंपन्यांच्या डेटाच्या आधारे अभ्यासात असे आढळून आले की, कौशल्यांमधील तफावत हा आज व्यवसाय परिवर्तनातील सर्वात महत्त्वाचा अडथळा आहे. नोकरीसाठी आवश्यक असलेल्या सुमारे ४० टक्के कौशल्यांमध्ये बदल होणार आहे. नोकऱ्या करत असणाऱ्या ६३ टक्के लोकांमध्ये कौशल्याचा अभाव असल्याचा उल्लेख देखील या अहवालात करण्यात आला आहे.

**'मुलभूत मानवी कौशल्ये'ही महत्त्वाची**

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या अहवालानुसार, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), बिग डेटा आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रातील तंत्रज्ञान कौशल्यांची मागणी जलद वाढण्याची अपेक्षा आहे; परंतु सर्जनशील विचारसरणी, लवचिकता आणि चपळता यासारख्या मानवी कौशल्यांची मागणी कमी होईल, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**'या' क्षेत्रात सर्वाधिक रोजगार वाढ**

वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञान आणि मानवी कौशल्य प्रकारांचे संयोजन वाढत्या प्रमाणात महत्त्वाचे ठरणार आहे. २०३० पर्यंत 'काळजी' आणि 'शिक्षण' यासारख्या अग्रगण्य भूमिका आणि आवश्यक क्षेत्रांमध्ये सर्वाधिक रोजगार वाढ होण्याची शक्यता आहे. एआय आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रातील प्रगती बाजारपेठेला आकार देत आहे. अनेक तंत्रज्ञान किंवा तज्ज्ञांच्या भूमिकांच्या मागणीत वाढ होत आहे.

**'हे' व्यावसायिक क्षेत्र वाढणार**



२०३० पर्यंत शेती कामगार, डिलिव्हरी ड्रायव्हर्स आणि बांधकाम कामगारांसह आघाडीच्या भूमिकांमध्ये सर्वात मोठी रोजगार वाढ होण्याची शक्यता आहे. नर्सिंग व्यावसायिकांसारख्या काळजी घेणाऱ्या नोकऱ्यांमध्ये आणि माध्यमिक शाळेतील शिक्षकांसारख्या शिक्षण भूमिकांमध्येही लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. कारण लोकसंख्याशास्त्रीय ट्रेंडमुळे आवश्यक क्षेत्रांमध्ये मागणी वाढेल. अक्षय ऊर्जा आणि पर्यावरण अभियांत्रिकीमध्ये या क्षेत्रांमध्ये तज्ज्ञांच्या भूमिकांची मागणी वाढण्याची अपेक्षा आहे, असे देखील अहवालात म्हटले आहे.

**क्लर्क, कॅशियरच्या नोकऱ्या धोक्यात**

कॅशियर आणि प्रशासकीय सहाय्यकांसारख्या भूमिका सर्वात वेगाने कमी होत आहेत. त्यांच्यासोबत ग्राफिक डिझायनर्ससारख्या इतर क्षेत्रात घट होण्याची शक्यता आहे. कारण जनरेटिव्ह एआय वेगाने कामगार बाजारपेठेला आकार देत आहे, असे देखील अहवालात स्पष्ट केले आहे. एआय अवलंब जगभरातील उद्योगांमध्ये परिवर्तन घडवून आणत आहे. कंपनीतील नोकरी करणारे लोक नवीन कौशल्य शिकण्यासाठी योजना आखत आहेत. ऑटोमेशनमुळे ४१ टक्के कंपन्या त्यांचे कर्मचारी कमी करण्याच्या तर ७७ टक्के लोक त्यांच्या कामगारांना कौशल्य वाढवण्यासाठी योजना आखत असल्याचे देखील या अहवालात म्हटले आहे.

**'या' क्षेत्रातील नोकऱ्या वेगाने घटतील**

दुसरीकडे, सर्वात वेगाने घटणाऱ्या पाच नोकऱ्यांच्या यादीत कॅशियर आणि तिकीट क्लर्क हे सर्वात वर आहेत. प्रशासकीय सहाय्यक आणि कार्यकारी सचिव, इमारत काळजीवाहू, सफाई कामगार आणि घरकाम करणारे, मटेरियल-रेकॉर्डिंग आणि स्टॉक-कीपिंग क्लर्क आणि प्रिंटिंग आणि संबंधित ट्रेड कामगार यांचा क्रमांक लागतो. त्यानंतर अकाउंटिंग, बुक कीपिंग आणि पेरोल क्लर्क, अकाउंटंट आणि ऑडिटर, ट्रान्सपोर्टेशन अटेंडंट आणि कंडक्टर, सुरक्षा रक्षक, बँक टेलर आणि संबंधित क्लर्क यांच्या नोकऱ्यात वेगाने घट होईल, असे देखील अहवालात स्पष्ट केले आहे.

**'या' क्षेत्रात नोकऱ्यांची चलती वेगाने**

२०३० पर्यंत सर्वात वेगाने वाढणाऱ्या कौशल्यांमध्ये एआय आणि मोठा डेटा, नेटवर्क आणि सायबर सुरक्षा, तांत्रिक साक्षरता आणि सर्जनशील विचार यांचा समावेश असेल. त्यानंतर लवचिकता, चपळता, कुतूहल आणि आजीवन शिक्षण, नेतृत्व आणि सामाजिक प्रभाव, प्रतिभा व्यवस्थापन, विश्लेषणात्मक विचार आणि पर्यावरणीय व्यवस्थापन यांचा समावेश असेल.

# तुमच्या प्रामाणिकपणावर शंका निर्माण होते...!

## दिल्ली उच्च न्यायालयाने आपला फटकारले



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कॅग अहवालावरील विधानसभेतील चर्चेला विलंब लावल्याबद्दल दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी आम आदमी पक्षाच्या सरकारला फटकारले. दिल्लीतील उत्पादन शुल्क धोरण अनियमिततांनी भरलेले होते. त्यामुळे सरकारी तिजोरीला २,०२७ कोटी रुपयांचे नुकसान झाले, असे कॅगने आपल्या अहवालात नमूद केले आहे. तुम्ही ज्या पद्धतीने तुमचे पाऊल मागे घेतले आहे, त्यामुळे तुमच्या प्रामाणिकपणावर शंका निर्माण होते. दिल्लीतील उत्पादन शुल्क धोरणातील अनियमिततांवर बोट ठेवणाऱ्या कॅग अहवाल सभापतींना पाठवून सभागृहात चर्चा सुरू करायला हवी होती, अशी अपेक्षाही न्यायालयाने व्यक्त केली. कॅगचा अहवाल विधानसभेत मांडण्याच्या मुद्द्यावर भाजपच्या सात आमदारांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीवेळी उच्च न्यायालयाने आपली भूमिका स्पष्ट केली.

**भ्रष्टाचार**

दिल्ली सरकारच्या वतीने सांगण्यात आले की, विधानसभेची बैठक बोलणणे हा विधानसभा अध्यक्षांचा अंतर्गत कामकाजाचा भाग आहे. आता विधिमंडळाची उत्तराधिकारी सार्वजनिक लेखा समिती (पीएसी) कायदेशीर चौकटीनुसार अहवालांची तपासणी करू शकते. हा तपासणी अहवाल आगामी निवडणुकीनंतर पुढील विधानसभेद्वारे निवडली जाईल. दरम्यान, नुकतेच या प्रकरणी नायब राज्यपालांनी त्यांच्या उत्तरात म्हटले होते की, उच्च न्यायालयाला सभापतींना अहवाल ताबडतोब सभागृहासमोर सादर करण्याचे निर्देश देण्याचा अधिकार आहे. तसेच त्यांनी अहवाल सादर करण्यात होणाऱ्या अवाजवी विलंबाकडेही लक्ष वेधले होते.

कॅग अहवालावरील विधानसभेतील चर्चेला विलंब लावल्याबद्दल विरोधी पक्षनेते विजेंदर गुप्ता आणि भाजप आमदार मोहन सिंग बिष्ट, ओम प्रकाश शर्मा, अजय कुमार महावार, अभय वर्मा, अनिल कुमार बाजपेयी आणि जितेंद्र महाजन यांनी याचिका दाखल केली आहे.

**भ्रष्टाचारासाठी आप-भाजप जबाबदार**

अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव आलोक शर्मा यांनी शनिवारी म्हटले की, "मागील ११ वर्षांच्या कुशासनामुळे दिल्ली भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीची राजधानी बनली आहे. यासाठी आम आदमी पक्ष आणि केंद्रातील भाजप सरकार जबाबदार आहे.

# भारत-बांगलादेश तणावात वाढ

## भारताने बजावले उपउच्चायुक्तांना समन्स शेख हसीना प्रकरणानंतर संबंध बिघडले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत आणि बांगलादेश संबंधांमधील तणाव वाढत चालला आहे. वाढत्या तणावाबाबत चर्चा करण्यासाठी भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी बांगलादेशचे उपउच्चायुक्त नुरुल इस्लाम यांना समन्स बजावले. परराष्ट्र मंत्रालयाने समन्स बजावल्यानंतर दुपारी नुरल इस्लाम साउथ ब्लॉकमधून निघून जाताना दिसले. दरम्यान, भारत-बांगलादेश सीमेवर पाच ठिकाणी कुंपण बांधण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप बांगलादेशने केल्यानंतर दोन्ही देशांमधील सीमा तणाव वाढला आहे.

४,१५६ किलोमीटरच्या भारत-बांगलादेश सीमेवर पाच विशिष्ट ठिकाणी कुंपण बांधण्याचा प्रयत्न भारत करत असल्याचा आरोप झाल्यानंतर, रविवारी बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने भारतीय उच्चायुक्त प्रणय वर्मा यांना समन्स बजावले होते. भारताची ही कृती ही कारवाई सीमेवरील हालचालींवर नियंत्रण ठेवणाऱ्या द्विपक्षीय कराराचे उल्लंघन असल्याचे म्हटले होते. यानंतर सोमवारी परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशचे उपउच्चायुक्त नुरल इस्लाम यांना समन्स बजावले. प्रणय वर्मा रविवारी स्थानिक वेळेनुसार दुपारी ३ च्या सुमारास ढाका येथील परराष्ट्र मंत्रालयाच्या मुख्यालयात दाखल झाले. बांगलादेशच्या सरकारी वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जशिम उद्दीन यांच्याशी त्यांची सुमारे ४५ मिनिटे भेट झाली.

या भेटीत बांगलादेशच्या परराष्ट्र सचिवांनी सुनामगंज मध्ये एका बांगलादेशी नागरिकाच्या कथित हत्येबद्दल तीव्र चिंता आणि निराशा व्यक्त केली. त्याला प्रत्युत्तर देताना भारतीय उच्चायुक्तांनी सीमेपलीकडील गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी आणि तस्करी, गुन्हेगारांच्या हालचाली आणि तस्करीच्या आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी सहकार्यात्मक दृष्टिकोनावर भर दिला.

बांगलादेशच्या परराष्ट्र सचिवांची भेट घेतल्यानंतर वर्मा यांनी पत्रकारांना सांगितले की, मी परराष्ट्र सचिवांची भेट घेतली आणि गुन्हेगारीमुक्त सीमा, गुन्हेगारांची हालचाल आणि मानवी तस्करी प्रभावीपणे सुनिश्चित करण्यासाठी भारताच्या वचनबद्धतेबद्दल चर्चा केली. बीएसएफ आणि बीजीबी हे आमचे दोन सीमा रक्षक दल संपर्कात असून या सामंजस्याची अंमलबजावणी केली जाईल आणि गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी सहकार्याचा दृष्टिकोन अवलंबला जाईल, असे ते म्हणाले.

# अजित पवारांचेही एकला चलो रे..!

## मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढवणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुती सरकारमधील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बृहन्मुंबई महापालिका निवडणुकीत एकट्याने निवडणूक लढवणार आहे. महायुतीसरकारमध्ये सहभागी असलेले भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्र निवडणूक लढवणार असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या निर्णयामागील मुख्य कारण महायुतीतील बिघाड नसून जागावाटपाबाबत असलेला संभ्रम आणि ठोस रणनीतीचा अभाव आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकला चलो मागे दोन मोठी कारणं आहेत. पहिली बाब म्हणजे महापालिकेकडे केवळ २२७ जागा आहेत. कमी जागा असल्याने भाजप आणि शिवसेना अजितदादांच्या पक्षाला सामावून घ्यायला तयार नाहीत आणि दुसरं कारण म्हणजे मुंबईच्या शहरी भागात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा जनाधार कमी आहे, त्यामुळे त्यांनी युती करून निवडणूक लढवली तर साहजिकच भाजप आणि शिंदे सेना त्यांना कमी जागा देतील. जे त्यांना मान्य होणार नाही. त्यामुळे अजित पवार यांनी मुंबई महापालिका निवडणुकीत एकट्याने लढण्याचा आणि मुंबईत पक्षाचा जनाधार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ते स्वबळावर महापालिकेची निवडणूक लढवणार आहेत.

महाराष्ट्रात भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना युतीचे सरकार आहे. नोव्हेंबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत युतीला निर्णायक बहुमत मिळाल्यानंतर महायुतीचे सरकार स्थापन झाले. भाजप १३२ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मित्रपक्ष शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या.

एकट्या मुंबई शहरी भागात महायुतीने विधानसभेच्या एकूण १० पैकी ९ जागा जिंकल्या आहेत.

# आयशर अपघात ६ ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** मुंबई आग्रा महामार्गावरील






द्वारका उड्डाण पुलावर पिकअप अन् आयशरचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला असून पाच ते सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. जखमींना स्थानिकांच्या मदतीनं जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. आयशर गाडीला पाठीमागून वेगात आलेल्या पिकअप गाडीनं धडक दिली. या अपघातात मृत्यू झालेले सर्वजण कामगार असल्याची माहिती समोर येत आहे.

मिळलेल्या माहितीनुसार सिडको येथील सह्याद्रीनगर भागातील रहिवासी चेतन गंभीरे यांच्या घरी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलं होता. या कार्यक्रमासाठी रविवारी सकाळी परिसरातील महिला आणि पुरुष हे दोन स्वतंत्र टेम्पोमधून प्रवास करून निफाड तालुक्यातील धारणगाव येथे धार्मिकस्थळी गेले होते. सायंकाळी कार्यक्रम आटपून परतीचा प्रवास करताना महिला भाविकांना घेऊन टेम्पो नाशिकच्या दिशेने रवाना झाला. हा टेम्पो सह्याद्रीनगर येथे पोहोचून काही वेळ होत नाही तोच पुरुषांच्या टेम्पोला द्वारका चौकाच्या अलीकडे उड्डाणपूलावर भीषण अपघात झाला. टेम्पोने सळया असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की टेम्पोचा चुराडा झाला.

# गुलाबी फ्लेमिंगो

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**दक्षिण फ्रान्स** दक्षिण फ्रान्समधील सेंटेस-मेरी-दे-ला-मेर येथील कॅमर्गू नैसर्गिक उद्यानात सूर्यास्ताच्या वेळी गुलाबी फ्लेमिंगोंचे टिपलेले हे मनमोहक छायाचित्र.

# तिरुपतीत पुन्हा एक दुर्घटना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**आंध्र प्रदेश :** तिरुपती मंदिरात पुन्हा एक दुर्घटना घडली. तिरुपती तिरुमला देवस्थानम मंदिरातील लाडू वितरण केंद्राजवळ सोमवारी आग लागली. काऊंटरजवळ मोठी गर्दी असताना ही आग लागली. आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. अग्निशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दहा दिवसचालणाऱ्या बैकुंठ द्वार दर्शनम उत्सवादरम्यान ही घटना घडली. या निमित्ताने देशभरातून हजारो लोक तेथे दाखल झाले आहेत.

८ जानेवारी रोजी घडलेल्या या घटनेच्या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला असताना, ही घटना घडली आहे. ८ जानेवारी रोजी मंदिरात चेंगराचेंगरी झाली होती. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर ४० जण जखमी झाले होते. तिरुपतीतील एमजीएम शाळेजवळ असलेल्या बैरागी पट्टेडाजवळ ही चेंगराचेंगरीची घटना घडली होती. भाविकांना वैकुंठ द्वार दर्शनम्चे तिकीट काढायचे होते आणि त्यातूनच चेंगराचेंगरी निर्माण झाली. या घटनेनंतर मंदिरात अत्यंत कडक कारवाई करण्यात येत असून, हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. तरीही हा झालेला अपघात चिंतेचा विषय ठरत आहे.

# मुंबई पालिका रुग्णालये सलाईनवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना आणि दवाखान्यांना औषधांचा पुरवठा करणाऱ्या १५० हून अधिक पुरवठादारांनी सोमवारपासून औषधांचा पुरवठा बंद करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मागील चार महिन्यांपासून १२० कोटी रुपयांची बिले थकवल्यानं हा निर्णय घेण्यात आल्याचं ऑल फूड अँड ड्रग्स लायसन्स होल्डर फाउंडेशनचं म्हणणं आहे. त्यामुळे याचा परिणाम पालिके अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमधील औषध पुरवठ्यावर होणार आहे.

**अनागोंदी**

मुंबईची सार्वजनिक रुग्णालयांची आरोग्य व्यवस्था ही अत्यावश्यक औषधांसाठी १५० हून अधिक औषध आणि अन्य सुविधा पुरवठादारांवर अवलंबून आहे. केईएम, सायन आणि कूपर, नायरसारखी पालिका रुग्णालये दररोज हजारो रुग्णांना सेवा देतात. या रुग्णालयांमध्ये केवळ मुंबईतीलच नाहीतर मुंबई बाहेरूनदेखील हजारो रुग्ण उपचारासाठी येत असतात. या सर्व औषध पुरवठादारांनी महापालिकेकडून थकीत बिले मिळेपर्यंत औषधांचा पुरवठा केला जाणार नसल्याचा निर्णय घेतला. त्यामुळे रुग्णांना औषधांसाठी तारेवरची कसरत करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.


# उत्तर सीमेवरील परिस्थिती संवेदनशील -जनरल उपेंद्र द्विवेदी

**दहशतवाद**

**जम्मू आणि काश्मीरमध्ये मारण्यात आलेले ६० टक्के दहशतवादी हे पाकिस्तानी आहेत. राज्यात सक्रिय असलेले ८० टक्के दहशतवादीदेखील पाकिस्तानीच आहेत. काश्मीरमधील हिंसाचाराचे मूळ पाकिस्तानात आहे. येथे हिंसाचाराचे प्रमाण कमी झाले आहे.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांची माहिती यांनी सोमवारी पूर्व लडाखसह देशाच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीबद्दल माहिती दिली. भारताच्या उत्तर सीमेवरील परिस्थिती संवेदनशील असली, तरी स्थिर असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ऑक्टोबरमध्ये पूर्व लडाखमधील देपसांग आणि देमचोकमधील परिस्थिती निवळली. या दोन्ही ठिकाणी गस्त घालण्यास सुरुवात करण्यात आली आहे, असेही द्विवेदी यांनी सांगितले.



द्विवेदी म्हणाले, "पूर्व लडाखमधील परिस्थिती संवेदनशील असली, तरी नियंत्रणात आहे. एलएसीवरील सैन्य तैनाती समतोल आणि मजबूत आहे. आम्ही कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज आहोत. उत्तरेकडील सीमांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे युद्ध प्रणालीमध्ये विशिष्ट तंत्रज्ञानाचा समावेश शक्य झाला आहे."


२०२० मध्ये चीनच्या घुसखोरीमुळे भारत-चीन सीमेवर तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. चार वर्षांच्या तणावाच्या परिस्थितीनंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये सैनिकांमध्ये झटापट झाली होती. गलवान खोऱ्यातही भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये झटापट झाली होती. यात २० भारतीय सैनिक शहीद झाले होते. या तणावाच्या पार्श्वभूमीवर सैन्य स्तरावरील चर्चेनंतर दोन्ही देश मागे हटण्यावर सहमत झाले. या प्रदेशातील तणाव अजूनही पूर्ण निवळलेला नाही. येथील परिस्थितीबाबत बोलताना द्विवेदी म्हणाले की, सीमा भागात पायाभूत सुविधा सुधारण्यावर भर दिला जात आहे.

### हिंसाचाराचे मूळ पाकिस्तानात

● काश्मीरमधील हिंसाचाराचे मूळ पाकिस्तानात आहे. येथे हिंसाचाराचे प्रमाण कमी झाले आहे. स्थानिक नागरिकांना शांतता हवी आहे. एकूणच जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती नियंत्रणात आहे. पाकिस्तानला लागून असलेल्या नियंत्रण रेषेवर संघर्षविराम सुरू आहे. पण तरीही घुसखोरीचा प्रयत्न केला जात असल्याचे द्विवेदी यांनी सांगितले.

**'जम्मू-कश्मीरमध्ये सक्रिय ८० टक्के दहशतवादी पाकिस्तानी'**

जम्मू-कश्मीरमध्ये सक्रिय असलेले ८० टक्के दहशतवादी हे पाकिस्तानी आहेत, असे लष्करप्रमुख जनरल द्विवेदी यांनी म्हटले आहे. "जम्मू आणि काश्मीरमध्ये मारण्यात आलेले ६० टक्के दहशतवादी हे पाकिस्तानी आहेत. राज्यात सक्रिय असलेले ८० टक्के दहशतवादीदेखील पाकिस्तानीच आहेत, तेही अशा वेळी जेव्हा आपण दहशतवादाकडून पर्यटनाच्या दिशेने वाटचाल करत आहोत." असे त्यांनी नमूद केले.



"मला दिल्ली विमानतळावर इंडिगोचा आणि त्यांच्या स्टाफचा सर्वात वाईट अनुभव आला. विशेषत: काउंटर मॅनेजर सुष्मिता मित्तल यांचे वर्तन पूर्णपणे अस्वीकार्य होते. मी वेळेवर योग्य काउंटरवर पोहोचलो होतो, परंतु त्यांनी अनावश्यकपणे मला दुसऱ्या काउंटरवर पाठवले. — अभिषेक शर्मा

कपिल जेव्हा उत्तर आणि हरियाणाचा कर्णधार बनला तेव्हा त्यांनी मला न कळवता संघातून काढून टाकले. माझ्या पत्नीची इच्छा होती की मी कपिलला संघातून काढून टाकण्याबद्दल प्रश्न विचारावेत. मला खूप राग आला. मी माझे पिस्तूल काढले आणि चंदीगडमधील सेक्टर ९ मध्ये कपिलच्या घरी पोहोचलो. — योगराज सिंह



# आयर्लंडविरुद्ध भारताचा विजय

## जेमिमाह, दीप्तीने गाजवले मैदान : मालिकाही टाकली खिशात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**राजकोट :** भारतीय महिला क्रिकेट संघाने रविवारी (१२ जानेवारी) आयर्लंड महिला संघाविरुद्ध दुसऱ्या वनडेत ११६ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने वनडे मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. दुसऱ्या सामन्यात भारताची सांघिक कामगिरी महत्त्वाची ठरली. फलंदाजांसोबतच गोलंदाजांनीही त्यांची भूमिका चोख पार पाडली. या सामन्यात भारताने आयर्लंडसमोर विजयासाठी ३७१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंडला ५० षटकात ७ बाद २५४ धावाच करता आल्या.

आयर्लंडकडून साराह फोर्ब्स आणि गॅबी लेविस यांनी चांगली सुरुवात केली होती. पण गॅबीला ८ व्या षटकात सायली सातघरेने १२ धावांवर माघारी धाडले. पण नंतर साराहसोबत कुल्टर रेलीने डाव पुढे नेला. त्यांच्यात अर्धशतकी भागीदारीही झाली. पण त्यांच्याकडून खूप धीम्यागतीने खेळ झाला.

२१ व्या षटकात साराहला दीप्तीने त्रिफळाचीत करत त्यांची जोडी तोडली. साराहने ६३ चेंडूत ३८ धावा केल्या. त्यानंतर २७ व्या षटकात ओर्ला प्रींडरगास्टला ३ धावांवरच प्रिया मिश्राने माघारी धाडले. तिचा झेल सायली सातघरेने घेतला.

तरी त्यानंतरही कुल्टर रेली आणि लौरा डेलानी यांनी ८३ धावांची भागीदारी करत संघाला ४० षटकांपर्यंत १८० धावांचा टप्पा पार करून दिला होता. यादरम्यान कुल्टर रेलीने अर्धशतक केले. पण कुल्टर रेलीला तितास साधूने ११३ चेंडूत केलेल्या ८० धावांवर त्रिफळाचीत केले. ४२ व्या षटकात डेलानीला ३७ धावांवर दीप्तीने पायचीत केले. नंतर अर्लिन केली (१९) आणि एवा कॅनिंग (११) या देखील स्वस्तात बाद झाल्या. अखेरीस आयर्लंडला लक्ष्यापर्यंत पोहचता आले नाही. लीह पॉल २७ धावांवर नाबाद राहिली, तर जॉर्जिना डेम्पसी ६ धावांवर नाबाद राहिली.

भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या, तर प्रिया मिश्राने २ विकेट्स घेतल्या. तसेच तितास साधू आणि सायली सातघरे यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. दीप्तीचा हा १०० वा वनडे सामनाही आहे.

### हर्लिन देओल आणि जेमिमा रोड्रिग्स यांच्यात मोठी भागिदारी

- या दोघी बाद झाल्यानंतर हर्लिन देओल आणि जेमिमा रोड्रिग्स यांच्यात १८३ धावांची भागीदारी झाली. त्यामुळे भारताने ३०० धावांचा टप्पा सहज पार केला होता. हर्लिन ४८ व्या षटकात ८४ चेंडूत ८९ धावा करून बाद झाली. त्यापोठापठ ऋचा घोषही १० धावांवर बाद झाली.
- जेमिमाने शतक केले. हे तिचे पहिलेच आंतरराष्ट्रीय शतकही ठरले. तिला शतकानंतर शेवटच्या षटकात अर्लिन केलीने बाद केले.
- जेमिमाहने ९१ चेंडूत १२ चौकारांसह १०२ धावा केल्या. त्यामुळे भारताने ५० षटकात ५ बाद ३७० धावा केल्या. आयर्लंडकडून ओर्ला प्रींडरगास्ट आणि अर्लिन केली यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या, तर जॉर्जिना डेम्पसीने १ विकेट घेतली.

## सबालेन्का, झ्वेरेवची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मेलबर्न :** संभाव्य विजेतेपदाच्या शर्यतीत असणाऱ्या कार्लोस अल्कराझ आणि यानिक सिन्नेर यांच्यासमोर आव्हान उभे करू शकणारा दुसरा मानांकित अॅलेक्झांडर झ्वेरेव आणि सलग तिसऱ्या ऑस्ट्रेलिया विजेतेपदासाठी उत्सुक असणारी अरिना सबालेन्का यांनी ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत आपल्या मोहिमेस थाटात सुरुवात केली.

पहिल्या फेरीच्या लढतीत झ्वेरेवने थेट प्रवेश मिळालेल्या फ्रान्सच्या लुकास पौलीचा ६-४, ६-४, ६-४ असा पराभव केला. झ्वेरेवने अगदी सहज २ तास २० मिनिटांत विजय मिळवला. सलग नवव्यांदा झ्वेरेवने या स्पर्धेची दुसरी फेरी गाठली. बोरिस बेकरनंतर ग्रँडस्लॅम विजेतेपद मिळवणारा पहिला जर्मनीचा खेळाडू बनण्यासाठी झ्वेरेव गेली काही वर्षे प्रतीक्षेत आहे. पण, त्याचे हे स्वप्न अद्याप साकार झालेले नाही. त्याची गाठ आता स्पेनच्या पेड्रो मार्टिनेझशी पडेल. अर्थात, या वेळी अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास पूर्ण करण्यासाठी त्याला अल्कराझ किंवा नोव्हाक जोकोविच यांच्यापैकी एकावर मात करावी लागेल.

## चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियन संघ जाहीर

**नवी दिल्ली :** १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला



आहे. संघात मॅट शॉर्ट आणि अॅरॉन हार्डी सारख्या नवीन चेहऱ्यांचा समावेश आहे, या दोघांची प्रथमच आयसीसी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नॅथन एलिसला बीबीएलमधील कामगिरीचा फायदा पाकिस्तान आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये होणाऱ्या स्पर्धेत संघात समतोल राहावा यासाठी सर्व बाबी लक्षात घेऊन संघाची निवड करण्यात आली आहे. होबार्ट हरिकेन्सला बीबीएल १४ च्या अंतिम फेरीत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नॅथन एलिसचा संघात समावेश करण्यात आला आहे. शॉर्ट, हार्डी आणि एलिस या त्रिकुटाने डेव्हिड वॉर्नर, कॅमेरॉन ग्रीन आणि शॉन अॅबॉट यांची जागा १४ महिन्यांपूर्वी एकदिवसीय विश्वचषक जिंकलेल्या संघातून घेतली आहे. वॉर्नरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. पाठीच्या शस्त्रक्रियेमुळे ग्रीन स्पर्धेबाहेर आहे.

**आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ :** पॅट कमिन्स (कर्णधार), अॅलेक्स कॅरी, नॅथन एलिस, आरोन हार्डी, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मार्नस लॅबुशेन, मिचेल मार्श, ग्लेन मॅक्सवेल, मॅथ्यू शॉर्ट, स्टीव्ह स्मिथ, मिशेल स्टार्क, मार्कस स्टॉइनिस, अॅडम झाम्पा.

## ट्रिनिटी स्पोटर्स, एसएआरके संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत





**पुणे :** एसए-आरके अॅकॅडमी तर्फे आयोजित 'एसए-आरके अजिंक्यपद करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट (२५ षटके) स्पर्धेत ट्रिनिटी स्पोटर्स अॅकॅडमी आणि एसएआरके क्रिकेट अॅकॅडमी या संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत होणार आहे. हांडेवाडी येथील एसए-आरके अॅकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मंथन शिंदे याने केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे त्रिनिटी स्पोटर्स अॅकॅडमीने आर्यन्स् क्रिकेट अॅकॅडमीचा ७ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या आर्यन्स् क्रिकेट अॅकॅडमीचा डाव ८८ धावांवर गडगडला. फिरकीपटू मंथन याने केवळ सात धावांमध्ये ४ गडी बाद केले. याशिवाय समर्थ बोबडे आणि दर्ष मांगल या दोघांनीही प्रत्येकी दोन गडी बाद केले. आर्यन्स्कडून आयुष गोसावी याने ४३ धावा केल्या. हे लक्ष्य त्रिनिटी स्पोटर्स अॅकॅडमीने १८.५ षटकात व ३ गडी गमावून सहज पूर्ण केले. विवान हंसराज (३७ धावा) आणि भुजंग धुलगुंडे (२२ धावा) यांनी संघाला सहज धावा जमवून विजय मिळवून दिला. अचूक गोलंदाजी आणि विरेन पाटील याच्या फलंदाजीमुळे एसएआरके संघाने ब्रिलियंट् स्पोटर्स अॅकॅडमीचा ६ गडी राखून पराभव करून अंतिम फेरी गाठली.

## डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, आझम कॅम्पसमध्ये आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे दिमाखात उद्घाटन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एम.सी.ई. सोसायटीच्या डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने २०२४-२५ साठीच्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा सोमवारी सकाळी व्ही.एम. गनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि पॅव्हेलियन, आझम कॅम्पस, पुणे येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा चे संचालक डॉ. सुदाम शेळके तसेच विशेष निमंत्रित म्हणून प्रसिद्ध पॅराऑलिम्पिक सचिन खिलारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाला एम.सी.ई. सोसायटीच्या उपाध्यक्षा आबेदा इनामदार, सचिव प्रा. इरफान शेख, खजिनदार प्रा. मुजफ्फर शेख, व विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. डी. लॉरेन्स, रजिस्ट्रार धनंजय पाळणे आदि मान्यवर उपस्थित होते. विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ.गुलजार शेख यांनी स्पर्धांबाबत प्रास्ताविक केले.एच.जी.एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशन च्या अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.अनिता बेलापूरकर यांनी स्वागतपर भाषण केले. प्रमुख पाहुणे डॉ. सुदाम शेळके यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना खेळ हे केवळ जिंकणे आणि हारणे नसून ते खऱ्या अर्थाने जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण देतात असे प्रतिपादन केले. या प्रसंगी सचिन खिलारे यांना त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरीबद्दल एक लाखाचा धनादेश देऊन महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन सोसायटीचे डॉ. पी. ए.इनामदार विद्यापीठातर्फे सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, अथलेटिक्स,कबड्डी, कॅरम, बुद्धिबळ,टेबल टेनिस अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व क्रीडाप्रेमींनी क्रीडा स्पर्धांचा आनंद लुटावा व विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संयोजकांनी केले.

## ऋग्वेद नांद्रेकर, श्लोक हिंगे यांचे सनसनाटी विजय





■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन आदित्य - कैफी टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२५ स्पर्धेत ऋग्वेद नांद्रेकर, श्लोक हिंगे यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

मिलेनियम नॅशनल स्कूल, कर्वेनगर येथील टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत ८ वर्षाखालील मुलांच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत ऋग्वेद नांद्रेकर याने अव्वल मानांकित तेजवीर भोईटेचा ५-३ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. चुरशीच्या झालेल्या लढतीत श्लोक हिंगेने चौथ्या मानांकित कृदय चांडकचा टायब्रेकमध्ये ५-४(५) असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

## युतिका, सफा उपांत्य फेरीत दाखल



**पुणे :** युतिका चव्हाण, सफा शेख यांनी पीवायसी एचटीबीसी-अमनोरा कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींच्या गटात आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. पीवायसी हिंदू जिमखाना येथील बॅडमिंटन कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेतील १९ वर्षांखालील मुलींच्या एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत अग्रमानांकित युतिका चव्हाणने एकिशा मेदानेवर २१-१२, २१-१२ असा विजय मिळवला. आता उपांत्य फेरीत तिची लढत मनिषा तिरुकोंडा आणि सान्वी पाटील यांच्यातील विजेतीशी होईल. चौथ्या मानांकित सफा शेखने सई अगवणेवर २१-१८, २१-१९ अशी मात केली.

## टेनिस स्पर्धेत स्निकी स्पार्टन्स संघाला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पिंपरी चिंचवड लॉन टेनिस अकादमी व पीएमडीटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पीसीएलटीए - एसटीएल वरिष्ठ लीग टेनिस स्पर्धेत स्निकी स्पार्टन्स संघाने विजेतेपद संपादन केले.

निगडी येथील पिंपरी चिंचवड लॉन टेनिस अकादमी येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत स्निकी स्पार्टन्स संघाने टीम जोश संघाचा २० - १८ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.


सामन्यात मिश्र दुहेरीत जोश संघाच्या गीता केकरे व गिरीश कुकरेजा यांनी स्निकी स्पार्टन्सच्या शैलजा कुमार व विनीत शहा यांचा ६-५ असा पराभव करून आघाडी घेतली, १०० अधिक गटात स्पार्टन्सच्या अमित लाटे व गजानन कुलकर्णी यांनी राजेश मित्तल व सचिन भास्करण यांचा ६-१ असा पराभव करून बरोबरी साधली. ९० अधिक गटात जोश संघाच्या संतोष रणसुभे व आशिष मणियार यांनी स्पार्टन्सच्या सुनील लुल्ला व निखिल भगत या जोडीचा ६-३ असा पराभव केला. अखेरच्या एकेरीच्या लढतीत स्निकी स्पार्टन्सच्या अजिंक्य पाटणकरने जोश संघाच्या कर्नल अर्जुन चितळेचा ६-५ असा पराभव करून संघाचा विजय सुकर केला.

स्पर्धेत ६ संघांमध्ये ४८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. विविध वयोगटातील खेळाडूंना खेळण्याची संधी मिळावी या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः या स्पर्धेत महिला टेनिस पटूंनी देखील आपला सहभाग नोंदवला होता.

## अय्यरकडे पंजाबच्या कर्णधारपदाची धुरा!

**नवी दिल्ली :** पंजाब किंग्जने आयपीएल २०२५ च्या हंगामासाठी संघाच्या नवीन कर्णधाराची घोषणा केली आहे. फ्रँचायझीने श्रेयस अय्यरची नवीन कर्णधार म्हणून निवड केली आहे. रविवारी पंजाब किंग्जने याची अधिकृत घोषणा केली. नवीन संघामध्ये प्रमुख जबाबदारी मिळाल्यानंतर श्रेयसने म्हटले की, "संघाने माझ्यावर विश्वास व्यक्त केला आहे, याचा मला सन्मान वाटतो. प्रशिक्षक पॉन्टिंगसोबत पुन्हा काम करण्यास मी उत्सुक आहे. मला आशा आहे की, मी संघाला पहिले विजेतेपद जिंकून संघ व्यवस्थापनाने दाखवलेल्या विश्वासाची परतफेड करू शकेन."

**राष्ट्र संचार डिजिटलच्या माध्यमातून 'पुण्याचा फोटो ऑफ द डे' अशा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला असंख्य इच्छुकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. आपल्या दृष्टीक्षेपातून त्यांनी काढलेले फोटो पाठवले. त्यामधून राष्ट्र संचारने काही फोटोंची निवड केली आहे. आज मकर संक्रांतीच्या निमित्ताने या निवडलेल्या फोटोला 'दैनिक राष्ट्र संचार' मध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहे.**




सर्वांचा विघ्नहर्ता व विद्येची देवता म्हणून ज्या गणरायाकडे आपण भक्तीने आणि श्रद्धेने पाहतो अशा पुण्यातील प्रसिद्ध असलेल्या दगडूशेठ मंदीराचे टिपलेले विलोभनीय छायाचित्र.

(छायाचित्र : संकेत विष्णू पवार, कोल्हापूर)

रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर निर्माण होणारी पोकळी भरून काढणार

# भारताचा' हा 'फलंदाज पुनरागमन करणार!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** नायरने इंग्लंडविरुद्धच्या चेन्नई कसोटीत ३०३ धावांची खेळई केली, परंतु त्यानंतर त्याला कसोटी संघात पुन्हा कधी खेळवले गेले नाही. त्याच्याबाबतीत असे का घडले हा खरा प्रश्न आहे, परंतु त्याने सध्या विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत आपले नाणे खणखणीत वाजवताना निवड समितीला त्याचा विचार करण्यास भाग पाडले आहे.

नायरने विजय हजारे ट्रॉफीच्या ६ डावांमध्ये नाबाद ११२, नाबाद ४४, नाबाद १६३, नाबाद १११, ११२ आणि नाबाद १२२ अशी फटकेबाजी केली आहे. त्याने ६६४च्या सरासरीने आतापर्यंत विजय हजारे ट्रॉफीच्या या पर्वात सर्वाधिक ६६४ धावा केल्या आहेत. लिस्ट ए क्रिकेटमध्ये एकदाही बाद न होता ५४१ धावांचा वर्ल्ड रेकॉर्ड त्याने विजय हजारे ट्रॉफीच्या या पर्वात नावावर केला आहे. एकाच पर्वात ५ शतकं झळकावण्याच्या एन जगदीसनच्या विक्रमाशीही त्याने बरोबरी केली आहे.

'मी सहा-सात महिने क्रिकेट खेळत नव्हतो, तेव्हा मी दिवसाचे तीन तास फक्त सरावाठी प्रवास करायचो. माझ्याकडे दुसरा कोणता पर्याय नव्हता. कोणत्याही फॉरमॅटसाठी माझ्या नावाचा विचार होत नव्हता आणि त्यावेळी मी खूप भावनिक झालो होतो. पण, यातून बाहेर पडून मला माझ्या खेळावर काम करायचे होते. आता मला पुन्हा संधी मिळाल्यास असा खेळ करायचा आहे की, मला संघातून बाहेर काढण्याची संधी द्यायची नाही. त्यासाठी मला धावा करत राहणे आणि सातत्य राखणे महत्त्वाचे आहे,'असे तो म्हणाला.

विराट कोहली व रोहित शर्मा यांचे कसोटी क्रिकेटमधील करियर जवळपास संपल्यात जमा आहे. अशा वेळी करुण नायरला संधी मिळू शकते. करुणने २०२३-२४ च्या रणजी हंगामात ६९० धावा केल्या आणि त्यानंतर कौंटी क्रिकेट गाजवताना तीन सामन्यांत ७८, १५० व २१ धावा केल्या.